# कृष्णार्पणमस्तु

KRISHANARPANMASTU Title-Code: MAHMAR52590

Volume : 2 | Issue : 3 | Marathi Monthly | Thane, 1 September 2024 to 30 September - 2024 | Pages 16 | Price : 10/-

### ‘हिवा-इंडिया’च्या पाठोपाठ ‘प्रोटेगो इंडिया’ या बहुराष्ट्रीय कंपनीत,

# पगार/बोनस वाढीच्या त्रैवार्षिक-करारांचं ‘पंचक’ पूर्ण करणारा...

## ‘राजन राजे’कृत ‘धर्मराज्य’चा ऐतिहासिक सलग ‘पाचवा करार’...!!!

**ऑईल-गॅस, औषधे, रासायनिक खते उत्पादक कंपन्यांना, ‘फ्लेम-रेस्टर, ब्रीदर-व्हॉल्व्ह’सारख्या औद्योगिक-सुरक्षा उपकरणांचा पुरवठा करणाऱ्या, नवी मुंबईस्थित (Rabale TTC) ‘प्रोटेगो इंडिया’ या, जर्मन बहुराष्ट्रीय कंपनीत...’धर्मराज्य पक्ष’प्रणित ‘‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा’’चा...अगदी टोकाच्या प्रतिकूल परिस्थितीतही कामगारांमध्ये सनसनाटी व थरार पैदा करणारा करार!**

...संबंधित कामगारवर्गामध्ये आनंदोत्साहाचं एकच उधाण!!

‘हिवा-इंडिया’च्या पाठोपाठ ‘प्रोटेगो इंडिया’ या बहुराष्ट्रीय कंपनीत, पगार/बोनस वाढीच्या त्रैवार्षिक-करारांचं ‘पंचक’ पूर्ण करणारा...‘राजन राजे’कृत ‘धर्मराज्य’चा ऐतिहासिक सलग ‘पाचवा करार’...!!!

या कराराचा तपशील डोळ्याखालून घालण्यापूर्वी, हा करार कुठल्या परिस्थितीत झाला हे पहाणं, समस्त कामगारांसाठी व संबंधितांसाठी फारच उद्बोधक ठरावं...

**कोविड-१९ काळाचा गंभीर परिणाम म्हणून, कंपनीची मागील चार वर्षांची उलाढाल खालीलप्रमाणे घसरणीला लागलेली असतानाच....**

**२०१९/२०.... रु.५० कोटी**
**२०२०/२१.... रु.४० करोड**



**२०२१/२२.... रु.३८ करोड**
**२०२२/२३....रु.३९ करोड**

...पोलादी ‘कामगार-एकजुटी’च्या बळावर व कंपनीच्या भविष्यकालीन वाटचालीत ‘धर्मराज्य’ संघटनेच्या बिरुदाखाली कामगारवर्गाकडून मनापासून मिळू शकणाऱ्या सकारात्मक योगदानाची व कडक शिस्तीची पुरेपूर खात्री,...पृष्ठ क्र. २ वर

## ज्या गद्दारीची सुरुवात ठाण्यातून झाली, त्या गद्दारांची तटबंदी ठाण्यातूनच उध्वस्त करा!

## ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष राजन राजे यांची, शिवसैनिकांना साद...






### राजन राजे लिखित, ‘इंडिया एक आयडिया’ पुस्तिकेचं उद्धव ठाकरेंच्या हस्ते दिमाखदार प्रकाशन

**ठाणे (प्रतिनिधी) :** ‘‘लोकसभा निवडणुकीनंतर, या संपूर्ण भारतातील सगळ्यात महत्त्वाची निवडणूक कुठली असेल तर, ती आता येऊ घातलेली महाराष्ट्र विधानसभा निवडणूक आहे. लोकसभा निवडणूक तुम्ही-आम्ही पाहिली, ‘इंडिया आघाडी’ म्हणून आपण सगळे एकत्र लढलो. ...पृष्ठ क्र. ६ वर

अंतरंग



ध्रुवताऱ्यासारखा अढळ व निधड्या छातीचा मराठी नेता...उद्धव ठाकरे
...राजन राजे
पृष्ठ क्र. ३



मुठभरांच्या हातात ‘सत्ता आणि मत्ता’ ठेवण्याची विकृत मानसिकता...
...राजन राजे
पृष्ठ क्र. ५



महाराज, आम्हाला क्षमा करा!
...राजन राजे
पृष्ठ क्र. ९

महाराष्ट्राच्या विवेकाला पक्षपाताचा झटका...
....राज गोखले
पृष्ठ क्र. १३

# मा. राजन राजे यांच्या उपस्थितीत, 'नेलेस इंडिया' कंपनीतील कामगार–कर्मचाऱ्यांचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न!



**नेलेस इंडिया प्रा. लि. (पार्ट ऑफ वालमेट) या ठाणे जिल्ह्यातील, डोंबिवली आणि अंबरनाथ येथे कार्यरत असलेल्या आस्थापनांमधील 'धर्मराज्य पक्ष'प्रणित 'धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघा'च्या कामगार सदस्यांचे स्नेहसंमेलन शुक्रवार, दि. २ ऑगस्ट–२०२४ रोजी, अंबरनाथ येथील 'आनंद–सागर' रिसॉर्टमध्ये पार पडले. सुमारे वर्षभरापूर्वी संपन्न झालेल्या, कामगारांच्या त्रैवार्षिक करारात नमूद केल्याप्रमाणे, हे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. गेल्या २५ ते ३० वर्षांत पहिल्यांदाच, अशाप्रकारचे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आल्यामुळे, कामगारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.** विशेष बाब म्हणजे, दोन्ही आस्थापनांमधील कायम कामगारांसोबतच, कंत्राटी कामगार, सफाई कामगार यांच्यासह, व्यवस्थापनातील अधिकारीवर्ग आणि कर्मचारीवर्गदेखील मोठ्या उत्साहाने या संयुक्त स्नेहसंमेलनात सहभागी झाला होता. उल्लेखनीय बाब अशी की, 'धर्मराज्य पक्ष' आणि 'धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी, ठाणे ते अंबरनाथ असा लोकल ट्रेनचा प्रवास करुन, आपल्या जुन्या आठवणींना पुन्हा एकदा उजाळा दिला. मुंबईची लाईफ–लाईन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकलमधून प्रवास करताना, मा. राजन राजे यांचा उत्साह द्विगुणित झाला होता. यावेळी त्यांच्यासोबत 'धर्मराज्य कामगार कर्मचारी महासंघाचे' महासचिव श्री. महेशसिंग ठाकूर आणि सचिव श्री. समीर चव्हाण हेदेखील सहप्रवासी म्हणून उपस्थित होते. दरम्यान, या स्नेहसंमेलनात 'नेलेस' व्यवस्थापनाचे अध्यक्ष श्री. कुणाल भावसार, मॅनेजर श्री. नितेश पोतदार, एच. आर. श्रीमती रीना, श्री. प्रफुल्ल जोशी, मनीष लाहोटी, सेफ्टी इन्चार्ज श्री. कैलास कुंभार, स्वप्नील भागवत, ॲडमिन श्री. नितीन ढमे आणि 'धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघा'चे उपाध्यक्ष श्री. रमाकांत नेवरेकर आदी मान्यवर, वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी मा. राजन राजे यांनी, उपस्थित कामगार–कर्मचारीवर्गाला समयोचीत मार्गदर्शन केले, त्याला उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात जोरदार प्रतिसाद दिला. या स्नेहसंमेलनाचे आयोजन युनियन युनिट कमिटी आणि सांस्कृतिक कमिटी यांनी संयुक्तपणे केले आणि ते यशस्वी केले.

## 'राजन राजे'कृत 'धर्मराज्य'चा ऐतिहासिक सलग 'पाचवा करार'...!!!

...पृष्ठ क्र. १ वरुन



प्रोटेगो–व्यवस्थापनाला (**MD** डॉ. लँडीस, **HR/IR** व्यवस्थापक श्रीमती पूजा विजन, उत्पादनविभाग प्रमुख श्री. उमेशजी पवार) असल्यामुळेच सदरहू करार संपन्न झालेला आहे....

**वर्ष २०२४ ते २०२७ या त्रैवार्षिक कालावधिच्या नवीन करारान्वये....**

**१) दरडोई किमान थेट वेतनवाढ.... रु.१०,५००/–**

**२) कमाल थेट वेतनवाढ.... रु.१२,९००/–**

**३) सरासरी थेट वेतनवाढ.... रु.११,६००/–**

**(थेट वेतनवाढ म्हणजे, C.T.C. वगैरे सारख्या, अलिकडच्या काळातील ''व्यवस्थापकीय फसव्या संकल्पने'नुसार फुगवून सांगितलेली बिलकूल नव्हे; तर, थेट महिनाअखेर पगाराद्वारे हातात पडणारी अधिकची रक्कम होय)**

४) 'सहा आकडी' म्हणजेच, रु. एक लाखाहून अधिक रकमेचा वार्षिक–बोनस करारान्वये मिळणार... वर्ष २०२४–२५ मध्ये,

किमान बोनस....रु.१,०५,०००/–

कमाल बोनस....रु.१,१५,०००/–

(वर्ष २०२४–२५च्या पुढे, २०% सूत्रानुसार बोनस प्रतिवर्षी वाढत्या पगारानुसार वर्धिष्णू होत जाणार)

**५) कराराद्वारे थेट हातात येणारा एकूण पगार,**

**किमान रु.६५,०००/–**

**कमाल रु.८०,०००/–**

**६) पगारातील ७०% वाढ ही, मूळ पगार व महागाई भत्त्यात (PF-Base मध्ये) समाविष्ट, त्यामुळे, भरभक्कम भविष्यनिर्वाह निधी (PF), ग्रॅच्युईटी, बोनस रुपाने कामगार–कर्मचारीवर्गाचं नोकरीतील जीवनमान; तसेच, निवृत्तीपश्चात भविष्य सुरक्षित व सुखीसमाधानी राखणारा करार....**

७) श्रेणीनिहाय (Grade-Wise), भरभक्कम ENTRY-LEVELS चा; तसेच, महागाई–निर्देशांकावर आधारित बदलत्या महागाईभत्त्याचा (Variable D.-.) अंतर्भाव करुन...संपूर्ण वेतनश्रेणी शास्त्रीय–पायावर (Scientific Base) रचण्यात आलेली व त्याद्वारे, आजमितीस कामावर असलेल्या कामगारांसोबतच, भविष्यात कंपनी सेवेत येऊन नोकरीत 'कायम' होणाऱ्या, पुढील नवतरुण पिढ्यांचंही आर्थिक–सुरक्षिततेसह 'आर्थिक–उन्नयन' सुनिश्चित करण्यात आलंय....

८) बव्हंशी सगळे कामगार नोकरीत 'कायमस्वरुपी'.... ('कंत्राटी–कामगार' नावाचे 'गुलाम' अथवा 'नवअस्पृश्य' कोणी कामासाठी घेतलेले नव्हेतच)

९) येऊ घातलेल्या 'काळ्या कामगार–संहिते'च्या सावटाखाली...बेरोजगारी व अर्धरोजगारीचा, कामगार–कपातीचा 'नंगानाच', मौजूदा 'भांडवली–व्यवस्थे'द्वारे देशभर चाललेला असताना, अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शिवछत्रपतींच्या राजनीतिनुसार 'तळागाळा'तील श्रमिकांची 'तळी' उचलणारा, हा ऐतिहासिक करार म्हणून नोंदला जावा...

***''धर्मराज्य'' आणि ''राजन राजे''... बस्, नाम ही काफी है!***

***(प्रोटेगो युनिट अध्यक्ष–ज्योतिर्लिंग घोडके, उपाध्यक्ष–संजय पालकर, सचिव–संतोष देसाई, सहसचिव–श्री. दिलीप सावर्डेकर यांच्यातर्फे प्रसारित...धन्यवाद!)***

# ध्रुवताऱ्यासारखा अढळ व निधड्या छातीचा मराठी नेता...उद्धव ठाकरे

“भितीपोटी गर्भगळीत झालेले विरोधी पक्ष नेते आणि 'लोकशाही-देवते'चं सत्ताधाऱ्यांकडून झालेलं 'अपहरण' आणि 'वस्त्रहरण' पाहून गोंधळलेली-धास्तावलेली जनता”, हे जगाच्या पाठीवर कुठेही आणि कुठल्याही देशासाठी...अराजक निर्माण करणारं, एक खात्रीलायक 'मिश्रण' ठरतं (जे आपण सध्या बांगलादेशात अनुभवतो आहोतच)!




**...आपल्याकडेही** EC, RBI, IT, ED, CBI व **प्रसारमाध्यमांसारख्या इतर एकूणएक सगळ्याच 'स्वायत्त-यंत्रणा' व बऱ्याच अंशी न्यायालयीन-व्यवस्थादेखील... सत्ताधाऱ्यांच्या आणि त्यांनी पोसलेल्या मूठभर भांडवलदारांच्या पैशाचिक-राक्षसी मुठीत आल्याने, आपल्याही देशात अराजकसदृश परिस्थिति होऊ घातलेली असण्याच्या पार्श्वभूमीवर; एक ध्रुवताऱ्यासारखा अढळ व निधड्या छातीचा (बनावट ५६” छातीचा नव्हे) मराठी नेता, दिल्लीश्वर सत्ताधाऱ्यांच्या छाताडावर पाय ठेऊन महाराष्ट्रात उभा ठाकलाय, त्याचं नाव 'उद्धव ठाकरे'!**

...तोच धीरोदात्तपणा, शनिवारच्या ठाण्यातील गडकरी-रंगायतनच्या शिवसेनेच्या कार्यक्रमाप्रसंगी मा. उद्धवजींनी दाखवून दिला...त्याबद्दल, त्यांचं मनःपूर्वक अभिनंदन!

ज्यांच्या डोक्यात 'सुपाऱ्या' भरलेल्या असतात आणि ज्यांच्या डोक्याची कवटी म्हणजे, निव्वळ 'नारळ' बनलेला असतो...अशीच माणसं, लोकशाहीत वेडीवाकडी विध्वंसक वागू शकतात; मग, ती कुठल्याही पक्षातली का असेनात! ही प्रवृत्ती ठेचली जाण्याची अपेक्षा पोलिसदलाकडून करण्याचे दिवस, ठाण्यापुरते तरी आता संपलेत. पोलिसांची भिती, फक्त आणि फक्त जनसामान्यांना व पापभीरु लोकांनाच उरलीय!

**“भ्रष्टाचाराचे विविध मार्ग कल्पकतेनं शोधणारे व ते पूर्ण क्षमतेने चोखाळणारे अनेक पोलिस-अधिकारी, 'ईडी'च्या नोटिशीला घाबरणाऱ्या डरपोक राजकीय नेत्यांसारखेच, (अर्थातच, आजवर त्यांनी केलेल्या पापाचरणामुळेच) सत्ताधारी राजकारण्यांना कमालीचे टरकून रहायला लागलेत”, हेच लज्जास्पद चित्र, ठाण्यात वारंवार दिसायला लागलंय. अगदी निवडून-वेचून काही बडे अधिकारी, या शहरात 'खास कामगिरी'साठी...पोलिसदलात, महापालिकेत व जिल्हाधिकारी कार्यालयात आणल्याचं सर्रास बोललं जातं.**

**'सारस्वतां'चं असलेलं आमचं ठाणे-शहर, पहाता पहाता 'रासवटां'चं माहेरघर होण्याची प्रक्रिया, चारपाच दशकांपूर्वीच सुरु झाली होती; ती प्रक्रिया फक्त आता, पूर्णत्वाला पोहोचू पहातेय, टिपेला जाऊ पहातेय इतकंच!**

**राजकीय गुंडापुंडांचा या शहराला पडलेला विळखा पहाता...या शहराची आणि आम्ही कष्टपूर्वक भरणा करत असलेल्या करांमुळे चालणाऱ्या, या शहरातल्या एकूणच व्यवस्थेची, आम्हा मूळच्या जन्माने 'ठाणेकर' असलेल्यांना भयंकर लाज वाटू लागलीय... हे शहर सज्जनशक्तिसाठी आता 'जहर' बनलंय...त्याचा निषेध करावा, तेवढा तो थोडाच!**

...जाता जाता, कुणाच्या तरी बहकावण्यातून आपापसात डोकी फोडून घेणाऱ्या, माझ्या प्राणप्रिय मराठी तरुणतरुणींना 'धर्मराज्य'तर्फे विनम्र निवेदन आहे की, कंत्राटी-कामगार पद्धती'तील गुलामगिरी-नवअस्पृश्यता, अर्धरोजगारीतलं तुटपुंजं वेतन, अमानुष आर्थिक-विषमता, भडकत्या महागाईसारखे अनेक रोजच्या जगण्यातले ज्वलंत प्रश्न आ वासून तुमच्याआमच्या समोर उभे आहेत; तिथे, 'नारळ आणि सुपाऱ्या' खरेदी करण्यात व फेकण्यात वाया जाणारी तुमची 'आंदोलन-ऊर्जा' वापरा व मराठी-माणसांच्या कल्याणाचे धनी व्हा...पण, असलं काही धाडस करायला 'शेठजीं'चे 'मिंधे' असलेले तुमचे नेते कधिच सांगणार नाहीत!

शनिवारी रात्री जे शेण फेकलं गेलं, ते कुणाच्या गाडीवर पडण्याआधी शिवबा-संतांनी निर्मिलेल्या महन्मंगल मराठी-संस्कृतीच्या तोंडावर पडलं, हे कृपया विसरु नका!!

**“कालपर्यंत माझ्या नजरेसमोर जे सेकंड-हॅण्ड मोटरसायकल-स्कूटरच्या पेट्रोलला महाग होते आणि जे रस्त्यावर रिक्षा-हातगाड्या आणि कोपऱ्यावर टपऱ्या चालवत होते...ते राजकारणात आल्यावर अल्पावधीतच ऐषोआरामी ४०-५० लाखाच्या महागड्या गाड्यांमधून फिरताना आम्ही पहात आलोय...कुठून येतो हा एवढा अचानक पैसा? कुठून येते ही 'श्रमाविना संपत्ती', ज्याला आपल्या भारतीय-अध्यात्मानुसार वा जाज्वल्य 'हिंदुत्वा'नुसार, थेट 'महापातक' म्हटलंय??**

...तरीही 'हिंदुत्वा'चाच 'बुरखा' ओढून, मुखवटा घालून हे काळे 'राजकीय-धंदे' बेधडक चाललेले दिसतात, हे ही एक आश्चर्यच... आणि, याच गोष्टींचं दुर्दैवाने तुम्हाला जर आकर्षण वाटत असेल; तर मग लक्षात ठेवा, “हजारात एखाद्याच्याच नशिबी, ब्लॅकमेलिंगच्या 'हप्ता-संस्कृती'तून अशी 'पातकी श्रीमंती' येते...पण, ती ज्यांना फळते, लखलाभ होते; ते आतून नुसते केवळ अस्वस्थच नसतात... तर, प्रचंड भयभीतही असतात (म्हणूनच तर, 'ईडीबिडी'च्या भितीने राजकारणात आपल्या पार्श्वभागाला पाय लावून इकडून तिकडे पळापळ-पक्षांतर करताना दिसतात अथवा आपल्या राजकीय-भूमिका सारख्या बदलताना दिसतात); तर, बाकीचे हजारातले उरलेले ९९९ शब्दशः भिकेला लागतात, तुरुंगात सडतात आणि सरतेशेवटी बेवारस कुत्र्यासारखे रस्त्यावर पोलिसांच्या लाठीमाराचे-गोळीबाराचे बळी ठरतात! भ्रष्ट व्यवहारांतून व अनीतिने झटपट श्रीमंत झालेले कुणीही...यथावकाश, श्रीकृष्णाच्या भगवतगीतेतील 'कर्मसिद्धांता'नुसार केल्या कर्मांची फळे कुटुंबियांसमवेत, या ना त्या स्वरुपात स्वतःही भोगतातच!

*...राजन राजे*

## आजची गोष्ट !

एक बहिरी ससाणा, एका सापाला आपल्या टोकदार पंजात धरुन आकाशात उडत होता. अचानक त्याच्या पंजातून साप निसटला आणि खाली एका विहिरीत जाऊन पडला. ससाण्याने सापाला पकडण्यासाठी जोरदार प्रयत्न केले; पण, दुर्दैवाने तो काही यशस्वी ठरला नाही. अखेर निराश होऊन ससाणा तिथून निघून गेला. इकडे विहिरीत पडलेल्या सापाने पाहिले की, विहिरीत चांगल्या गुबगुबीत बेडकांचं वास्तव्य आहे. सुरुवातीला तो काहीसा घाबरला; पण, तसं न दाखवता, विहिरीतल्या एका धक्क्यावर जाऊन बसला आणि बेडकांच्या प्रमुखाला शोधू लागला. नंतर त्याने त्यातल्याच एका बेडकाला बोलावले आणि म्हटले, “मी साप आहे... जर माझं विष पाण्यात मिसळलं तर, तुम्ही सगळी बेडकं मरुन जाल. म्हणून तुम्ही असं करा, रोज एक-एक बेडूक माझ्याकडे पाठवत जा, तो माझी सेवा करील आणि तुम्ही सगळे सुखात-आनंदात राहाल” ...अशातऱ्हेने साप रोज एक बेडूक खात राहिला. अखेर, बेडकांचा प्रमुखच काय तो उरला... त्याला पाहून साप म्हणाला, प्रधानजी आज तुमची पाळी आहे. सापाच्या या पवित्र्याने बेडकांचा प्रमुख प्रचंड घाबरुन म्हणाला, “हा विश्वासघात आहे!” त्यावर साप म्हणाला, जो आपल्यांशीच विश्वासघात करतो, त्याचा परिणाम हाच होतो... आणि शेवटचा उरलेला बेडूक त्याने ठरवल्याप्रमाणे मटकावला. थोड्यावेळाने साप, निवांतपणे विहिरीच्या बाहेर विसावला, तोच एका बहिरी ससाण्याने झडप मारुन सापाला आपल्या पंजात जखडले आणि म्हटले, “ओळखलंस मला? मी तोच आहे, ज्याच्या पिल्लांना तू गेल्यावर्षी क्रूरपणे खाल्लं होतंस. त्यानंतर तुला जेव्हा मी पकडून जात होतो, तेव्हा तू निसटलास आणि या विहिरीत पडलास... तेव्हापासून तुझ्या प्रत्येक हालचालीवर माझं बारीक लक्ष होतं. आता तर विहिरीतली सगळी बेडकं खाऊन तू आता चांगला गलेलठ्ठ झालायस... माझी पिल्लंही आता नव्याने मोठी होतायत, त्यांनाही तुला जिवंतपणी खाऊन आपल्या भावा-बहिणींचा सूड उगवायचाय!” ...आणि, त्यानंतर ससाण्याने उंच भरारी घेत, आपल्या घरट्याकडे उड्डाण घेतले. तात्पर्य, वाईट विचार आणि अनीती कितीही बलवान असले तरी, एक ना एक दिवस त्याचा पराभव निश्चित असतो !!!

# पोलीस हे, जनतेच्या संरक्षणासाठी की, गुन्हेगारांना पाठीशी घालून राजकारण्यांना संरक्षण देण्यासाठी ?

## ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष राजन राजे यांचा संतप्त सवाल...

**ठाणे (प्रतिनिधी) : बदलापूरमधील ‘आदर्श विद्यामंदिर’ या शाळेतील, वय वर्षे चार आणि वय वर्षे सहा या वयोगटाच्या दोन अल्पवयीन चिमुरड्या बालिकांवर, याच शाळेतील अक्षय शिंदे या सफाई कर्मचाऱ्याने लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक व घृणास्पद घटना घडलेली आहे. याच पार्श्वभूमीवर ‘धर्मराज्य पक्षा’च्या वतीने, दि. २२ ऑगस्ट–२०२४ रोजी, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ निषेध आंदोलन करण्यात आले. पक्षाध्यक्ष राजन राजे यांच्या नेतृत्त्वाखाली या आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस हे जनतेच्या संरक्षणासाठी की, गुंडपुंड राजकारण्यांना संरक्षण देण्यासाठी आणि त्यांच्या इशाऱ्यावर गुन्हेगारांना पाठीशी घालण्यासाठी? असा सवाल राजन राजे यांनी उपस्थित केला. यावेळी प्रसिद्धीमाध्यमांशी बोलताना राजन राजे म्हणाले, प्रश्न केवळ बलात्काराचा नसून, पोलिसांच्या व राजकारण्यांच्या बेकायदेशीर, बेईमान आणि नीतिशून्य व्यवहारातूनच बदलापूरकर जनतेच्या संतापाचा विस्फोट झालाय. पोलीस प्रशासन व राजकारणी यांच्यावरील विश्वास पूर्णपणे उडाल्यामुळेच, बदलापूरचे आंदोलन हिंसक बनून, ते आवरणं कठीण झालं होतं. म्हणूनच, पोलीस आणि सत्ताधाऱ्यांनी, सर्वप्रथम आपलं वर्तन, कार्यपद्धती सुधारावी आणि मगच, आंदोलकांवर कारवाई करावी. बदलापूरचं आंदोलन हे, एकूण परिस्थिती पाहता, उत्स्फूर्त व अत्यंत स्वाभाविक होतं, त्यामुळेच आंदोलकांवरील कारवाई तत्काळ मागे घ्या; अन्यथा, राजीनामे देऊन तोंड काळे करा!** असा जोरदार घणाघात राजन राजे यांनी पत्रकारांशी बोलताना केला. दरम्यान, बालिकांवरील लैंगिक अत्याचाराची घटना उघडकीस आल्यानंतर, शाळेतील समस्त पालकवर्ग आणि बदलापूरकर नागरिकांनी उत्स्फूर्तपणे रस्त्यावर उतरुन तीव्र निषेध–आंदोलन करीत, तब्बल ११ तास लोकल ट्रेनची वाहतूक रोखून धरली होती. प्रसिद्धीमाध्यमांद्वारे प्रकाशित झालेल्या बातम्यांनुसार, दोन्ही पिडीत बालिकांवरील लैंगिक अत्याचाराची घटना उघड झाल्यानंतर, सुरुवातीला शाळा प्रशासन आणि बदलापूर पोलिसांनी, संगनमताने हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला. तसेच, पीडित बालिकांचे पालक, पोलीस ठाण्यात तक्रार करण्यासाठी गेले असता, पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षिका शुभदा शितोळे या महिला अधिकारीकडून, त्यांना तब्बल १२ तास ताटकळत ठेवण्यात आल्याचे समोर आले आहे. या संतापजनक प्रकारानंतर जनप्रक्षोभ उसळल्यावर, पोलीस प्रशासनाने कारवाईला सुरुवात करुन, तपासकार्यात चालढकल केल्याच्या सबबीखाली शुभदा शितोळे यांची, ठाणे नियंत्रण कक्षात आणि नंतर मुंबईत तडकाफडकी बदली केल्याचे निदर्शनास आलेले आहे. ही बाब अत्यंत निंदनीय असून, संबंधित महिला पोलीस अधिकारी यांची बदली करणे म्हणजे, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केलेली नसून, **ज्या शुभदा शितोळे यांनी, शाळा प्रशासन आणि नराधम आरोपी यांना, पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला आहे, त्यांच्यावर कठोर–कायदेशीर कारवाई करणे हे क्रमप्राप्त ठरते. दुर्दैवाची बाब अशी की, एक महिला असूनही, अल्पवयीन चिमुरड्या बालिकांवर लैंगिक अत्याचार झालेला असतानादेखील, शुभदा शितोळे या महिला पोलीस अधिकारीने, पिडीत बालिकांच्या पालकांची तक्रार नोंदवून घेण्यास हलगर्जीपणा करीत, त्यांना तब्बल १२ तास ताटकळत ठेवले. हा प्रकार अत्यंत निंदनीय आणि घृणास्पद आहे. याप्रकरणी नराधम आरोपीला अत्यंत कठोर शिक्षा होईलच; परंतु, आपल्या कायदेशीर कर्तव्यात कसूर करणाऱ्या शुभदा शितोळे यांची, फक्त बदली करणे म्हणजे, पोलीस प्रशासन आणि राज्य शासनाच्या गृहविभागाकडून, संबंधित महिला पोलीस अधिकारीस पाठीशी घालण्यात येत असल्याचे, यानिमित्ताने स्पष्टपणे अधोरेखित होत आहे.** तरी, या संपूर्ण घटनेची सखोल चौकशी करुन, शुभदा शितोळे यांच्यावर गुन्हा नोंदविण्यात यावा आणि नराधम आरोपीस पाठीशी घालण्यात आल्याच्या आरोपाखाली, त्यांना पोलीससेवेतून तत्काळ बडतर्फ करुन, त्यांना सहआरोपी म्हणून घोषित करण्यात यावे आणि सश्रम कारावासाची कठोर शिक्षा ठोठावण्याकामी योग्य त्या न्यायालयीन कार्यवाहीची पूर्तता करण्यात यावी. त्याचप्रमाणे ‘आदर्श विद्यामंदिर’ या शाळेच्या प्रशासनाने, आपल्या शाळेतील चिमुरड्या बालिकांवर झालेल्या लैंगिक अत्याचाराचे प्रकरण गांभीर्याने न घेता, बलात्कारी नराधमाला पाठीशी घालून आणि पोलीस प्रशासनाशी संगनमत साधत केलेल्या कृत्याबाबत, संबंधित शाळा प्रशासनाच्या पदाधिकाऱ्यांची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी जोरदार मागणी ‘धर्मराज्य पक्षा’च्या वतीने यावेळी करण्यात आली. हा संपूर्ण घटनाक्रम अत्यंत निषेधार्ह आहे आणि म्हणूनच या घटनेचा निषेध करण्यासाठी, ‘धर्मराज्य पक्षा’च्या वतीने गुरुवार, दि. २२ ऑगस्ट–२०२४ रोजी, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, शासकीय विश्रामगृहाच्या बाहेर लोकशाही आणि सनदशीरमार्गाने निदर्शने करण्यात आली होती. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणात प्रशासनाचे प्रमुख या नात्याने, आपण योग्य ती कार्यवाही करीत, सर्व दोषींवर कठोरात कठोर कायदेशीर कारवाई करण्याबाबत, शासनदरबारी पाठपुरावा करावा अशी आग्रही मागणी, ‘धर्मराज्य पक्षा’च्या वतीने ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली. या आंदोलनाप्रसंगी ‘धर्मराज्य पक्षा’चे अध्यक्ष राजन राजे यांच्या नेतृत्त्वाखाली, पक्षाचे उपाध्यक्ष नितीन देशपांडे, सहसचिव नरेंद्र पंडित, ठाणे लोकसभा उपाध्यक्ष महेशसिंग ठाकूर, सचिन शेट्टी, ठाणे लोकसभा सचिव विनोद मोरे, ठाणे शहर अध्यक्ष जगन्नाथ सलगर, ‘धर्मराज्य कामगार–कर्मचारी महासंघा’चे सचिव समीर चव्हाण, प्रसिद्धीप्रमुख संजय दळवी यांच्यासह, अविनाश सावंत, अमित लिबे, निलेश सावंत, संभाजी गिरी, मनीषा सांडभोर, भावना ओरपे आणि कामगार सदस्य मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

### बदलापूर लैंगिक अत्याचारप्रकरणी, ‘धर्मराज्य पक्षा’चे ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर आंदोलन...



**भांडवली–व्यवस्था’, ज्या शहरं–उपनगरांतून विकसित होत जाते, तिथे ती प्रथम घट्ट पाळमुळं धरते आणि तिथून तिच्या पारंब्या, ग्रामीण भागात चहुबाजुंनी पसरुन भांडवली–वटवृक्ष विस्तीर्ण फैलावतो व त्याचं चांगलंच बळकटीकरण होतं. शहरांतून ती विविध सुखसुविधा निर्माण करते; परंतु, त्याच्याआड, शहरं–उपनगरं ती कमालीची महाग करत नेते; ज्यामुळे, तेथील जगण्याचे सगळे संदर्भ, आयाम साफ बदलून जातात. मग, दिवसाचा अर्ध्याहून अधिक काळ, पोटार्थी जगण्यातच (प्रत्यक्ष काम + कार्यालयीन प्रवासाचा वेळ) खर्ची पडत जातो... ‘‘महागड्या शहरांतलं महागडं रहाणीमान परवडत नाही आणि शहरांचा मोह सोडवतंही नाही’’; अशा ‘त्रिशंकू’ अवस्थेत संसार फुलवण्याचं स्वप्न पहाणाऱ्या त्या दोघांचं, भांडवली–रहाटगाडग्यात पिचणं सुरु होतं...जे कधिही, थांबणारं नसतं!**

**...राजन राजे** (भाई)

# मुठभरांच्या हातात 'सत्ता आणि मत्ता' ठेवण्याची विकृत मानसिकता...

**ही दर्दभरी कहाणी आहे, भारतातल्या औद्योगिक व सेवा क्षेत्रातील करोडो करोडो तरुणांची, ज्यांना 'कंत्राटी–कामगार', हे गोंडस संबोधन आहे; पण, ते वस्तुतः आहेत 'गुलाम'...ते आहेत आजच्या 'भांडवली–व्यवस्थे'तले 'नवअस्पृश्य', ज्यांच्या जगण्यातली माणुसपणाचं लक्षण असलेली 'सुरक्षितता' काढून घेण्यात आलेली आहे व जगण्यातला 'सन्मान' आजमितीस क्रूरपणे लाथाडला गेलेला आहे...जसा तो पूर्वी पदरी सर्रास गुलाम बाळगण्याच्या 'गुलामगिरी–प्रथे'च्या काळात नाकारला गेला होता व जसा तो, भारतीय जाती–व्यवस्थेच्या उतरंडीत बहुजन 'शूद्रां'ना नाकारला गेला होता!**

आपण, हे गुलामगिरीचे व नव–अस्पृश्यतेचे भोग भोगणाऱ्या, ज्या करोडो अश्राप जीवांविषयी बोलतो आहोत...ते ''९९.९९% हिंदूच'' आहेत, हे ही सरसंघचालकांना मुद्दाम सांगितलं गेलं पाहिजे!

**तर, कहाणी अगदी थोडक्यात अशी की, औद्योगिक व सेवा क्षेत्रात त्यांच्यासाठी नोकऱ्या आहेत; पण त्या औटघटकेच्या आहेत; आज आहेत, उद्याची शाश्वती नाही...नोकऱ्या आहेत; पण, त्यांना धड पगार नाहीत, या महागड्या जगात संसाराची फाटकी गोधडी त्यातून शिवता येत नाही...नोकरीच्या ठिकाणी त्यांना व्यवस्थापनाकरवी जाणिवपूर्वक सतत अपमानित केलं जातं असतं, त्यांची 'गुलाम' म्हणून असलेली 'औकात' मुद्दामहून 'जागती' ठेवून त्यांना उठसूठ ती दाखवली जात असते...मग, काय चुलीत घालायच्यात त्या नोकऱ्या, ती असली गुलामिरीतली 'अर्धरोजगारी'?**

**मुळातून नोकऱ्या असतात कशासाठी? जगणं सन्मानाचं करण्यासाठी आणि स्थिरस्थावर ठेवण्यासाठीच ना?? ...तर, हे जगण्याचे दोन्ही बुरुज ढासळवून टाकलेल्या व हातात उरलीसुरली दगडमाती ठेवणाऱ्या नोकऱ्या पत्करुन, कुणी सन्मानाने वा निश्चिंत जगू शकतो, आजच्या जगात?**

आज देशातली, विशेषतः महाराष्ट्र देशातली, नवतरुणाईची परिस्थिती एवढी गंभीर व शोचनीय आहे की, तरुणतरुणींची वयं वाढत चाललीयत; पण, कुणाची लग्न करुन संसार थाटायची हिंमत होत नाही...केलीच हिंमत तर, तकलादू–तुटपुंज्या पगारात भागत नाही म्हणून थाटल्या संसाराचे सर्रास 'विस्कोट व विस्फोट' होतायत..घटस्फोट होतायत, व्यसनाधीनता वाढतेय व कुटुंबासह जागोजागी आत्महत्या होतायत...फक्त, भांडवली–व्यवस्थेकरवी त्या आत्महत्यांना जाणिवपूर्वक शेतकऱ्यांच्या आत्महत्येसारखं, ''कंत्राटी–कामगारांची आत्महत्या'', असं 'ब्रॅण्डींग' मात्र केलं जात नाही...जेणेकरुन, वस्तुतः 'चोर व दरोडेखोर' असलेल्या कंत्राटदारांविरुद्ध व कंत्राटी–कामगार पद्धतीद्वारे 'कंपनी–दहशतवाद' (Corporate-Terrorism) माजवणाऱ्या व्यवस्थापकीय–मंडळींविरुद्ध आणि एकूणच 'कंत्राटी–कामगार पद्धती'विरुद्ध विद्रोह होऊ नये म्हणूनच केवळ!

**...या सगळ्या अखिल भारतीय पातळीवरील, प्रामुख्याने महाराष्ट्रात पसरलेल्या करुणाजनक परिस्थितीबद्दल व तरुणाईच्या अंतरी रौद्रभीषण तांडव माजवणाऱ्या या घटनाक्रमाबद्दल, कधि सरसंघचालकांनी अवाक्षर तरी काढलंय?**

**...पण, कुणी कितीही झाकलं तरी कोंबडं आरवल्याखेरीज रहात नाही. भारतापेक्षाही अधिक वेगात चकाचौंध आर्थिक–प्रगती करुन दाखवणाऱ्या; पण, अमानुष शोषण व टोकाच्या आर्थिक–विषमतेने ग्रासलेल्या...आणि म्हणूनच, 'उंटाच्या पाठीवरच्या शेवटच्या काडीसारखं' कुठलं तरी निमित्त गाठून भीषण उद्रेक घडलेल्या, बांगलादेशाच्याच वाटेवर आपला भारत देश असतानादेखील... भारताचं नाव जगात उज्वल करणाऱ्या गौतम बुद्धाच्या, 'गौतम' या शिरसावंद्य नावाला भयंकर काळिमा फासून जगभरात भारताचा दुर्लौकिक निर्माण करणाऱ्या 'गौतम' अदानीला जाहीर पाठिंबा देण्याचं राजकीय दुःसाहस सरसंघचालक करतात, पण कंत्राटी–कामगार पद्धतीबद्दल 'क' उच्चारत नाहीत, त्याबद्दल काय बोलावं?**



खरंतरं राऊंड–ट्रिपिंगसारख्या आर्थिक–लांड्यालबाड्या करणे, सत्ताधाऱ्यांकरवी प्रतिस्पर्ध्यांवर बेकायदेशीरपणे जबरदस्ती करुन त्यांचे उद्योगधंदे घशात घालणे, आपल्या मालकीच्या बंदरांमध्ये हजारो कोटींचे अंमलीपदार्थ वारंवार सापडणे, लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेली स्वतंत्र–पत्रकारितेची माध्यमं अवैध मार्गाने गोळा केलेल्या राक्षसी अर्थबळावर ताब्यात घेऊन त्यांची मुस्कटदाबी करणे...वगैरे जे असंख्य अत्यंत गंभीर स्वरुपाचे आरोप गौतम अदानीवर आजवर देशविदेशातून चारही बाजुंनी झालेले आहेत...त्यांची 'संयुक्त संसदीय समिती'तर्फे (Joint Parliamentary Committee...JPC) अतिशय पारदर्शक पद्धतीने चौकशी न करता, बनावट 'देशप्रेमा'चं बेगडी प्रदर्शन करत, सत्याला सामोरं जाण्याला बदमाषीपूर्ण नकार देणं...हा सारा देशघातकी प्रकार म्हणजे, 'सत्यमेव जयते' हे ब्रीद असणाऱ्या भारतीय–राजनीतिनुसार मोठा दंडनीय अपराध होय! एवढंच नव्हे तर, आपल्या जाज्वल्य हिंदुत्वानुसार अथवा भारतीय–आध्यात्मिक संकल्पनेनुसार ते भयंकर मोठं 'कुकर्म' असल्यामुळेच, तो अक्षम्य अपराध ठरतो! मग, कुठल्या 'हिंदुत्वा'च्या बाता सरसंघचालक व त्यांचे 'बोलबच्चन **बगलबच्चे' मारतायत?**

**ज्या 'वर्णवर्चस्ववादी–शोषक' मानसिकतेनं बहुजनांना 'शूद्र' ठरवून त्यांच्यावर अनन्वित अत्याचार केले होते, त्यांना सन्मानाचं जीणं नाकारुन पिढ्या न् पिढ्या 'अस्पृश्यता व गुलामगिरी' भोगायला लावली होती...आज मुठभरांच्याच हातात 'सत्ता आणि मत्ता' ठेवण्याची तिचं विकृत–मानसिकता वेगळ्या रुपात; पण, त्याच हिडीस स्वरुपात...कंपन्या–कारखान्यांमधून 'कंत्राटी–कामगार पद्धत' व त्या पद्धतीतूनच प्रसवल्या गेलेल्या OutSourcing, NEEM, FTE, अग्निपथावरील लष्करी अग्निवीर वगैरे 'डोकेबाज व धोकेबाज' असलेल्या 'पिलावळी'मधून दिसतेय... त्याविषयी, कधि बोलणार सरसंघचालक? ते अभागी कामगार–कर्मचारी 'हिंदू' नव्हेत; तर, काय पाकिस्तानी वा बांगलादेशातले कुणी 'आतंकवादी मुस्लिम' आहेत??**

...दूरवरच्या बांगलादेशामधला आक्रोश यांना हलवून सोडतो, बोलका करतो...पण, ज्या करोडो आत्म्यांचा आक्रोश, आपल्याच देशातील ही रक्तपिपासू–निर्मम–शोषक व्यवस्था (Vampire-State System) आपल्या टाचेखाली दडपून टाकून संपत्तीचे इमलेच्या इमले रचून उभी आहे...तो आजुबाजुचा 'आक्रोश' सरसंघचालकांच्या कानात शिरु शकत नाही, एवढे त्यांचे कान त्याबाबत ठार बहिरे झाले आहेत काय?? करोडो आत्म्यांच्या जीवघेण्या तडफडीची ती करुण स्पंदनं...त्यांच्या हृदयाच्या अंतर्हृदयात पोहोचू न शकण्याएवढं, त्यांचं 'हृदय' म्हणजे, कुठली 'दगडी चाळ' झाली आहे काय...???

***...राजन राजे***

---

भांडवली–व्यवस्थेच्या कृष्णछायेतील काही धवल रंगछटांनी 'नजरबंद' झालेल्या जनसामान्यांची...मग, अंधारयुगातली पायवाट तशीच पुढे बिनतक्रार चालू रहाते; तर, दुसरीकडे भांडवली–व्यवस्थेचा 'गाडा' विनाअडथळा–विनासायास धडाक्यात मार्गक्रमणा करत रहातो. बरं, या भांडवली–व्यवस्थेच्या पालखीचे भोई बनलेला सुशिक्षित मध्यमवर्गीय समाज, स्वतःला बुद्धिजिवी समजत असल्याने व भांडवली–व्यवस्थेतल्या कृष्णछायेतल्या धवल–छटांना कवटाळून, त्याचंही जीणं जगणं होत असल्याने, भांडवली–व्यवस्थेचं रौद्रभीषण अंतरंग समजून घेण्याची त्याची तयारी नसते. अशिक्षित–अडाणी लोकांना वरकड–मूल्य, शोषणाचा सिद्धांत, वर्गसंघर्ष वगैरे समजावून सांगणं एकवेळ सोपं; पण, या व्यवस्थेचे अंशतः 'लाभार्थी' असलेल्या सुशिक्षित मध्यमवर्गीयांना, ते समजावणं महाकर्मकठीण!

...राजन राजे (भाई)

# बलात्काराची मानसिकता...

- स्वतःकडे लिंग आहे म्हणून वय, नाते आणि माणुसकीचा कसलाही मुलाहिजा न बाळगता वासनाधीन होऊन स्त्रीवर बलात्कार करण्याची मानसिकता.
- पंचतारांकित हॉटेलात मद्यधुंद होऊन महागड्या गाड्या चालवत, रस्त्यावरील लोकांना बेदरकारपणे चिरडण्याची मानसिकता.
- राजकीय व्यभिचारातून मिळालेली सत्ता आणि भ्रष्टाचारातून कमावलेला पैसा याचा वापर करून दुसऱ्याला नागवं करण्याची मानसिकता.
- बिनधास्त खोक्यांची देवाण घेवाण करुन, ज्यांनी आपल्याला निवडून दिले, ते मतदार आणि ज्यांच्या जीवावर निवडून आलो ते कार्यकर्ते, यांच्या तोंडाला पाने पुसण्याची मानसिकता.
- स्वतःच्या धर्माचा, जातीचा फुकटचा अहंकार जपताना आपल्यापेक्षा दुर्बल धर्म, जाती यांच्यावर मॉब-लिंचिंग करण्यात राष्ट्रसेवा आहे, हे मानण्याची मानसिकता.
- संपत्तीच्या जोरावर कामगार, रहिवासी यांची परवड करुन, स्वतःचा नफा वाढविण्याची 'भांडवलशाही' मानसिकता....
- आपल्या अमर्याद संपत्तीचा सवंग देखावा मांडून लोकांचे दारिद्र्य अधोरेखित करण्याची मानसिकता.
- इतिहासातील महामानव आणि प्रतिके यांच्या शिकवणींचा चोथा करून त्यांचा उपयोग केवळ, आपल्या उथळपणाची पताका फडकवण्यासाठी व करण्याची मानसिकता.
- आपल्या हातात समाजमाध्यमांचा 'की-बोर्ड' आहे म्हणून, दुसऱ्याला अर्वाच्च शब्दात ट्रोल करण्याची मानसिकता.
- समाजातील या सर्व घटना घडत असताना, आपलं काय जातंय बुवा असा उदासीनपणा निर्विकारपणे जपण्याची मानसिकता.
- या सगळ्यांच्या परिणामांची दाहकता कमी अधिक असली; तरी, त्यामागच्या वृत्तीमध्ये एक समांतर मानसिकता दिसून येईल!



श्रेष्ठत्वाच्या भ्रामक कल्पना, कुठल्याही थराला जाऊन त्या जोपासण्याचा अट्टाहास, त्याला कुरवाळण्याचा माज, त्याची नशा चढल्यानंतर येणारी झिंग आणि त्यातून कायदा, शासन याबद्दल आलेली बेफिकिरी...हा त्याचा आलेख एकाधिकारशाहीकडे जाणारा आहे आणि जेव्हा, अशी मानसिकता केवळ राजकीय किंवा सामाजिक पातळीवर न राहता, समाजातील सामान्य लोकांची व्यक्तिक जीवन जगण्याची पातळी गाठते; तेव्हा, समाज म्हणून आपण संपलेले असतो.

उरतो तो फक्त, एकमेकांना गिळंकृत करण्यासाठी हपापलेल्या रानटी श्वापदांचा समूह.

...आणि, या झुंडीत 'माणूस' म्हणून जगण्याची धडपड करणारी एक विरळ होत चाललेली जमात.

स्वतःबरोबर एकदा निवांत बसून, आपण कुठल्या काळपात आहोत, हा प्रामाणिक संवाद आपल्यामधील प्रत्येकाने करणे, गरजेचे आहे....

...*सुशील मुणगेकर* *(समाजमाध्यमातून साभार...)*

---

*बांगलादेशातल्या हिंदुंसाठी 'नक्राश्रू' ढाळणारे 'सरसंघचालक' सर्वश्री मोहन भागवत...भारतातल्या हिंदुंविषयी कधि अश्रू ढाळणार...??? त्यांच्या आडनावातली 'भगवतता'...व्यवहारात कधि उतरणार, व्यवहारात कधि दिसणार??*

*...शेजारच्या बांगलादेशातल्या हिंदुंविषयी एवढी कणव जर सरसंघचालक खरंच बाळगून असतील...तर, अशा 'संवेदनशील' सरसंघचालकांसमोर, एखाद्या आटपाटनगरीची कहाणी असावी तशी, आपल्याच देशातल्या 'औद्योगिक व सेवा क्षेत्रा'तल्या नगरीतली... करोडो आत्म्यांची करुण कहाणी, आज मांडायचं ठरवलंय (अर्थातच, त्यांना हे सगळं 'ज्ञात' असलं किंवा त्यांच्यासारख्या बड्यांच्याच 'भांडवली-आशिर्वादा'ने ती कहाणी भारतीय-रंगमंचावर घडत आली असली... तरीही ''अन्यायाच्या दारातदेखील, एखादवेळेस न्याय मागून बघायला'', कुणाची हरकत नसावी!)*

## ज्या गद्दारीची सुरुवात ठाण्यातून झाली, त्या गद्दारांची तटबंदी ठाण्यातूनच उद्ध्वस्त करा! ...पृष्ठ क्र. १ वरुन

त्यावेळी या सगळ्यांच्या कानाजवळून तीर गेला. इलेक्टोरल बाँड, इलेक्शन कमिशन आणि इडी या सगळ्यांच्या मेहेरबानीमुळे ते फक्त धाराशाही झाले नाहीत, थोडक्यात वाचले; पण, त्यांची लाज गेली. एवढं सगळं करुन आज सगळे राजकीय तज्ज्ञ सांगतायेत की, सत्तर ते ऐंशी जागा यांनी लाटलेल्या आहेत आणि आता, 'अबकी बार मोदी सरकार' म्हणणाऱ्यांचा अहंकार धुळीला मिळाला. पण, ते संपलेत असं नव्हे. आपल्याला हे विसरुन चालणार नाही की, या ठाण्यातून दगाफटका झालेला आहे. ठाण्यातूनच सुरत ते गुवाहाटी असं गलिच्छ राजकारण झालेय. काळ्या पैशांतून आमदार विकत घेतले गेले. ज्याला आपण खोके सरकार म्हणतो, आजही घटनात्मकदृष्ट्या ते बेकायदेशीर आहे. तत्कालीन राज्यपालांचा कारभारही बेकायदेशीरच होता. त्यामुळे ज्या गद्दारीची सुरुवात ठाण्यातून झाली, त्या गद्दारांची तटबंदी येत्या विधानसभा निवडणुकीत ठाण्यातूनच सर्वप्रथम उध्वस्त करा!'' असा जोरदार घणाघात करीत, 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांनी, ठाण्यातील शिवसैनिकांना साद घातली. शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या माध्यमातून महाराष्ट्रभरात 'भगवा-सप्ताह' आयोजित करण्यात आला आहे. यावेळी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार, दि. १० ऑगस्ट-२०२४ रोजी, सायंकाळी ७ वा. घेण्यात आलेल्या सभेत, राजन राजे बोलत होते. यावेळी आपल्या धडाकेबाज भाषणातून, उपस्थित शिवसैनिकांशी संवाद साधताना राजे पुढे म्हणाले की, आपल्या महाराष्ट्रधर्माचा आणि या संपूर्ण सज्जनशक्तीचा, या गद्दारांकडून जो काही अवमान करण्यात आलाय, तो आपल्याला विसरून चालणार नाही. यानिमित्ताने मला आपल्याला एवढंच सांगायचंय, ज्या महाशक्तीच्या इशाऱ्यावर या लोकांनी उद्धवजींचं सरकार पाडलं, त्यांना धडा शिकवायची वेळ आता आलेली आहे आणि ही संधी विधानसभेच्या निवडणुकीत आपल्याला गमावून चालणार नाही. ज्याप्रकारे महाभारतात दुर्योधन आणि दुःशासनाच्या इशाऱ्यावर शकुनी फासे टाकत होता, त्याचपद्धतीने इथे गलिच्छ राजकारणाचे फासे टाकले गेले. इथे मला आवर्जून सांगायचंय की, उद्धवजी ठाकरे महाराष्ट्रात आणि भारतात राहुलजी गांधी हे जे कोदंडधारी धनुष्य हातात घेऊन उभे आहेत, त्यांच्या धनुष्यातून असे शकुनीचे फासे फेकले जात नाहीत तर, त्यांच्या धनुष्यातून तीक्ष्ण बाण रोरावत बाहेर पडतात. ते रामबाण आहेत, अशा शब्दांत राजन राजे यांनी, शिवसैनिकांमध्ये स्फुल्लिंग चेतवले. दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष राजन राजे यांनी, जे काही सलग १८ लेख लिहिले होते, त्या लेखांचा संग्रह असलेल्या 'इंडिया एक आयडिया' या पुस्तिकेचं प्रकाशन शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्या शुभहस्ते दिमाखात संपन्न झाले. यावेळी गडकरी रंगायतनमध्ये उपस्थित असलेल्या हजारो शिवसैनिकांना या पुस्तिकेचं वाटप करण्यात आले. आगामी विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने, या पुस्तिकेतील प्रासंगिक मुद्द्यांचा संदर्भ घेत, लोकांशी बोलताना, भाषणं करताना आणि मतदारांशी संपर्क साधताना, त्यातील लेख मार्गदर्शक ठरतील, असा आशावाद राजन राजे यांनी, शेवटी बोलून दाखवला.




### महाराष्ट्रात नवीन पायंडा पडतोय!

काश्मीरची नव्हे आणि बदलापूरची तर नव्हेच नव्हे... तर, अगदी ताजी घटना आहे ही झारखंडची! झारखंडची राजधानी रांचीच्या मोराबादी मैदानावर भाजपा युवा मोर्चातर्फे 'आक्रोश-रॅली' आयोजित करण्यात आली होती. त्या दरम्यान, झालेल्या हिंसाचारात भाजपा-युवा मोर्चावाल्यांनी अट्टल दंगेखोरांसारखी खुलेआम पोलिसांवर तुफान दगडफेक करत त्यापैकी अनेक पोलिसांना गंभीर जखमी केलंय.

बदलापुराच्या घटनेतील छुटपुट दगडफेकीचं निमित्त साधून समस्त बदलापूरकर-आंदोलकांना, मोठी पोलिसी-कार्यक्षमता दाखवत (जी एरव्ही, अंबरनाथ-बदलापुरच्या गुंड राजकारण्यांकडून दिवसाढवळ्या सर्रास गुन्हे घडत असताना पेंड खात असते), जेरबंद करणारे भाजपावाले यावर काही प्रतिक्रिया देणार का?.. एवढंच नशीब समजायचं की, त्या बदलापूरच्या शाळेत लहानग्यांवर लैंगिक-अत्याचार करणारा कुणी 'मुस्लिम' नव्हता आणि बदलापूर-स्टेशनमध्ये रेल-रोको करणारेही कुणी 'मुस्लिम' नव्हते... तसं काही दुर्दैवाने असतं; तर मग, सगळे गुजराथी 'बँकबुडवे मोदी' परदेशात पळाले, तसं त्या शाळा-संस्थाचालकाला पळून जाण्यास भाजप-सरकारने 'छुपी मदत' केली असती व महाराष्ट्राची विधानसभा-निवडणूक वेड्यावाकड्या पद्धतीने जिंकण्यासाठी महाराष्ट्रभरात दंगलप्रवण वातावरण 'भाजपा आयटी-सेल' व 'अंधभक्तां'करवी निर्माण केलं असतं... आणि समजा, त्या दंगलीच्या भांडवलावर निवडणूक जिंकलीच असती; तर, जिंकल्यापश्चात 'शाळेत सीसीटीव्ही न लावणाऱ्या व मुलींच्या सुरक्षिततेची अजिबात काळजी न घेणाऱ्या' त्या संस्थाचालक 'नरपुंगवा'ला, निवडणूक जिंकण्यासाठी निमित्त बहाल केल्याबद्दल 'बक्षिसी' म्हणून, कुठलातरी शैक्षणिक क्षेत्रातला वगैरे 'नरवीर' बनवून 'पद्मश्री' बहाल केली असती (सध्या 'राज्यसभा-सदस्यत्व' किंवा 'मानवाधिकार-आयोगा'चं अध्यक्षपद रिक्त नसल्याने केवळ, 'पद्मश्री'वरच भागवावं लागलं असतं)!

- राजन राजे

बदलापूर येथे दोन चिमुरड्या बालिकांवर घडलेल्या लैंगिक अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर, शिवसेना-युवासेना-युवतीसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने ठाणे रेल्वे स्थानक (पश्चिम) परिसरात शक्ती कायद्याची अंमलबजावणी करण्यात येण्यासाठी स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली होती. या कार्यक्रमाला 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी उप-स्थित राहून, शक्ती कायद्याची अंमलबजावणी व्हावी यासाठी आप-ली स्वाक्षरी नोंदविली. दरम्यान, मा. उद्धवजी ठाकरे यांनी, आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात शक्ती कायदा मंजूर करुन घेतला होता; मात्र, पक्षातील गद्दारीमुळे त्यांना मुख्यमंत्रीपद सोडावे लागले होते. त्यानंतर सत्तेवर बसलेल्या महायुती सरकारने या कायद्याची अंमलबजावणी केली नसल्यानेच, महाराष्ट्रात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ झाली असल्याचे, बदलापूरच्या घटनेवरुन अधिकच अधोरेखित झालेले असल्याने, या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी अशी मागणी करीत, ही स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली होती. याप्रसंगी 'धर्मराज्य पक्षा'चे सहसचिव श्री. नरेंद्र पंडित, ठाणे लोकसभा सचिव श्री. विनोद मोरे आणि 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे सचिव श्री. समीर चव्हाण आदी पदाधिकारी उपस्थित होते.










# न्यायालयाचा निर्णय मान्य, पण..... काही अनुत्तरीत प्रश्न!

''घटनात्मक अथवा संविधानिक न्यायालय म्हणून गणल्या गेलेल्या उच्च न्यायालयाचा 'महाराष्ट्र-बंद' बाबतचा निर्णय पटला नसला; तरी, निर्णयाचा सन्मान राखणं मान्य, पण.....''

...यातून काही गंभीर प्रश्न अनुत्तरित रहातायत, ज्याचं 'सूतोवाच', मा. उद्धवजी ठाकरे यांनी आपल्या आजच्या ताज्या पत्रकार-परिषदेत केलंय....

तोच धागा पकडून आम्ही खालील सवाल जनतेसमोर ठेवत आहोत;

- **न्यायालयाने 'बंद' बेकायदेशीर असल्याचा आयत्यावेळी निर्वाळा दिलाय... बदलापूरकरांच्या उत्स्फूर्त जनक्षोभाची भावना 'कायदाबाह्य' ठरवलेली नाही; उलट काल मा. न्या. रेवती मोहिते-डेरे आणि मा. न्या. पृथ्वीराज चव्हाण यांनी सरकारवर अत्यंत कडक भाषेत ताशेरे झाडले होते;**

**...तेव्हा, आज अचानक मोकाट 'बोलकं' झालेलं महाराष्ट्राचं (बेकायदेशीर व घटनाबाह्य असलेलं) 'ट्रिपल-इंजिन', त्या कालच्या ताशेर्यांवर, अगदी सायडींगला गेल्यासारखं मूग गिळून गप्प का बसलं होतं?**

- मा. सर्वोच्च-न्यायालयाने महाराष्ट्राच्या लांछनास्पद सत्तापालटात, तत्कालिन 'काळी-टोपी'धार्या राज्यपालांचं 'काळं' वर्तन...'घटनाबाह्य व बेकायदेशीर' ठरवलं होतं; पण, त्यांना ना आजवर कुठलीही शिक्षा झालेली, ना त्यांचे बेकायदेशीर निर्णय फिरवले गेलेले.

... शिवाय, विषय, महाराष्ट्रासारखं देशातलं सर्वच दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण व प्रगत असलेलं राज्य चालवण्याचा असूनही, गेली दीडदोन वर्षे न्यायालयीन-निकालाचं घोंगडं




भिजतं पडलेलं आहे; अशा न्यायालयीन-व्यवस्थेचं करायचं तरी काय?

- **''भाजपाने 'इलेक्टोरल-बॉण्ड'द्वारे महाघोटाळा-फसवणूक केलेली आहे'', हा सर्वोच्च न्यायालयीन निकाल येतो...पण, त्या बेकायदेशीरपणे गोळा केलेल्या 'काळ्या' पैशावरच गेली लोकसभा-निवडणूक व इतर राज्यांच्या निवडणुका 'भाजपा'ने लढवल्या...त्याचं काय?**(भरीला भर म्हणून त्यातील निवडणूक-आयोगाची पक्षपाती भूमिका व त्यांची वादग्रस्त एतच् व्यवस्था, याबाबतचे दावे सर्वोच्च न्यायालयात आजही प्रलंबितच...)

- **''मी ही राज्यघटना, तुमच्या हातात दिल्यानंतर, आता तुम्हाला त्याद्वारे पारदर्शकपणे न्याय देणारी व सरकारी-प्रभावापासून पूर्णतया मुक्त आणि मूलतः स्वतंत्र असलेली 'न्यायालयीन-व्यवस्था' आपसूकच मिळालेली असल्याने... तुम्हाला तुमच्या लोकशाही-हक्कांसाठी व तुमच्यावरील अन्याय-अत्याचार-शोषणाच्या परिमार्जनासाठी इतःपर आंदोलने, उपोषणे वगैरे करण्याची वेळ येणे नाही''... असा दुर्दम्य आशावाद व्यक्त करणाऱ्या 'घटनाकार' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना...ही आणि अशीच, 'न्यायालयीन-व्यवस्था' अभिप्रेत होती काय??** ...पृष्ठ क्र. ८ वर




*भारताच्या ७८व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त, ठाणे जिल्हा शिवसेनेच्या वतीने, शहरातील चंदनवाडी शिवसेना शाखा येथे १४ ऑगस्टच्या मध्यरात्री, मोठ्या दिमाखात देशाचा स्वातंत्र्योत्सव साजरा करण्यात आला. यावेळी 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांची विशेष पाहुणे म्हणून उपस्थिती होती. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे माजी खासदार श्री. राजन विचारे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली स्वातंत्र्यदिनाचा हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी ठाणे जिल्हाप्रमुख श्री. केदार दिघे, जिल्हा संपर्कप्रमुख श्री. मधुकर देशमुख, शहरप्रमुख श्री. प्रदीप शिंदे, महिला आघाडीच्या नेत्या श्रीमती रेखाताई खोपकर, सौ. समिधा मोहिते यांच्यासह, 'धर्मराज्य पक्षा'चे ठाणे लोकसभा अध्यक्ष श्री. राजेश गडकर, लोकसभा उपाध्यक्ष व 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे महासचिव श्री. महेशसिंग ठाकूर, पक्षाचे सहसचिव श्री. नरेंद्र पंडित, महासंघाचे सचिव श्री. समीर चव्हाण तसेच, धर्मराज्य पक्षाचे कार्यकर्ते श्री. संजय दळवी, श्री. दिनेश चिकणे, श्री. अमित लिबे, श्री. निलेश सावंत उपस्थित होते. याप्रसंगी देशाच्या सीमेचे रक्षण करणाऱ्या माजी सैनिकांचा व विरपत्नींचा श्री. राजन विचारे आणि श्री. केदार दिघे यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. स्वातंत्र्यदिनाच्या या दिमाखदार सोहळ्याला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शेकडो शिवसैनिक, पदाधिकारी उपस्थित होते.*



*शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाच्या, ठाणे शहर महिला संघटिका सौ. प्रमिला शिवाजी भांगे यांच्या ठाण्यातील सावरकरनगर येथील निवासस्थानी, स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून, दि. १५ ऑगस्ट-२०२४ रोजी, सत्यनारायणाच्या महापुजेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी उपस्थित राहून, दर्शनाचा लाभ घेतला. यावेळी सौ. प्रमिला शिवाजी भांगे यांनी, मा. राजन राजे यांचे, शाल आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.*

## ...निर्णय पटला नसला; तरी, निर्णयाचा सन्मान राखणं मान्य, पण.....

...पृष्ठ क्र. ७ वरुन

- पोलिसांच्या FIR मधले जर बहुसंख्य वा सारेच, मूळ 'बदलापूरकर' असतील आणि कुठल्याही राजकीय पक्षांशी अर्थाअर्थी मुळीच संबंधित नसतील...तर, बदलापूर बाहेरच्या लोकांनी बदलापूरमध्ये येऊन जनक्षोभाच्या नावाखाली जाणिवपूर्वक आंदोलन पेटवलं...अशी 'कोल्हेकुई' करणाऱ्या राजकीय-महाभागांचं थोबाड फुटल्यासारखं होत नाही का?
- समस्त निम्नमध्यमवर्गीय बदलापूरवासीय (जी बहुशः तथाकथित 'विकासा'च्या रेट्याखाली ठाण्यामुंबईतून जबरदस्तीने विस्थापित झालेली मराठी-माणसंच आहेत) वीज, पाणी, रस्त्यासारख्या पायाभूत सुविधांच्या अभावामुळे कायमची त्रस्त असतानाच; तुटपुंज्या पगारात दिवसेंदिवस अतिशय महागडी होत जाणारी आरोग्यसेवा व मुलांची शिक्षणं, यामुळे भयंकर गांजून गेली असताना...आपल्या मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न असा अचानक विकृत व विकट स्वरुपात उभा ठाकलेला पाहून व त्याहीपेक्षा, अत्यंत संतापजनक बाब म्हणजे, संबंधित शिक्षण-संस्थाचालक सत्ताधारी 'भाजपा'चे मोठे पदाधिकारी असल्याने, पोलिसदलाकडून तक्रार दाखल करुन घेण्यात अक्षम्य दिरंगाई होण्याच्या रास्त संशयाने... अशातऱ्हेच्या, होऊ नये अशा स्वरुपातला उद्रेक होणं, अगदी स्वाभाविकच असल्याचं एखादं शेंबडं पोरदेखील सांगेल...मग ते, 'टक्केवारी'पुरतं तरी तल्लख असलेल्या ट्रिपल-इंजिन सरकारला कळत नाही, असं थोडचं आहे? पण, आपलं राज्यच बेकायदेशीर-घटनाबाह्य असल्याची मनोमन जाणिव असल्याने, त्यांना आंदोलक जनसामान्यांवर कायमची मोठी दहशत बसवायचीय, जेणेकरुन पुन्हा कोणी आपल्यावरील अन्याय-अत्याचार-शोषणाविरुद्ध आवाजच उठवू नये!
- नरेंद्र मोदी-अमित शाह भाजपाई-संघीय सरकारची ''काळी कामगार-संहिता'' महाराष्ट्रभरात लागू झाल्यानंतर (ज्याच्या अंमलबजावणीला, तत्कालिन मुख्यमंत्री मा. उद्धवजी ठाकरे यांनी स्वतःच्या अधिकारात पुरेसा पायबंद घातला होता; मात्र, कामगारघातकी 'ट्रिपल-इंजिन' सत्तेवर आल्यापासून त्यादिशेने तत्परतेनं पावलं टाकली जात आहेत) जर, कामगार-आंदोलनांची 'कायदेशीर मुस्कटदाबी' केली जाऊन 'संपा'सारखी भांडवली शोषण-अन्यायाविरुद्धचा कामगारांच्या हाती असलेला सर्वात प्रभावी 'लोकशाही-हक्क'च जबरदस्तीने काढून घेतला जाणार असेल...तर, कामगार-कर्मचारीवर्गाने 'कंपनी-दहशतवादा'तून (Corporate-Terrorism) होणारे त्यांच्या आत्म्यांवरील 'बलात्कार' चूपचाप निमूटपणे सहन करत रहायचे का? मग, आम्ही १५ ऑगस्ट-१९४७ साली असंख्य नरवीरांच्या बलिदानातून व त्यागातून मिळवलेल्या स्वातंत्र्याचा उपयोग काय व ते कशासाठी मिळवलं?? आमची 'राज्यघटना', ही शोभेची वस्तू आहे काय???

जनतेच्या जखमेवर 'टोचा' मारणारा एक 'टोच्या-कावळा' 'भाजपा'ने पाळलाय...आतातरी, आपण कुणाच्या नादी लागलो होतो, हे एसटी कामगार-कर्मचारीवर्गाच्या यानिमित्ताने ध्यानात यावं, इतकंच...**धन्यवाद!**

# महाराज, आम्हाला क्षमा करा!

पाश्चात्य देशात, जनता स्वतः वर्गणी जमा करुन आपापल्या राष्ट्रपुरुषांचे, महापुरुषांचे पुतळे उभारते... अगदी, अमेरिकन 'स्वातंत्र्य देवतेचा पुतळा' (Statue Of Liberty) देखील, विविध सार्वजनिक-उपक्रम राबवून, जनतेनेच पैसा गोळा करुन उभारला होता. पण, आपल्याकडे जनतेला भांडवली-व्यवस्थेनं एवढं 'कफल्लक' आणि राजकारण्यांनी एवढं 'फुकटं' बनवून ठेवलंय की, जनता पुतळे उभारण्यासाठी सोडाच; पण, निवडणुका लढवण्यासाठी देखील कपर्दिकही (जुन्या काळचं नाणं) देत नाही...हे सगळं आमच्या आकलनशक्ति पलिकडचं झालंय आणि कुणी आम्हाला ते प्रामाणिकपणे समजावून सांगत असेल; तर, समजून घ्यायची आमची मानसिकता नाही!

**पं. नेहरुंच्या हस्ते उद्घाटन झालेला प्रतापगडावरचा शिवछत्रपतींचा पुतळा...सह्याद्रीच्या कडेकपारीतील धो धो पाऊस आणि वेगवान वादळवारे अंगावर झेलत, आजही दिमाखात उभा आहे आणि मधल्या ६० वर्षांत तर, तंत्रज्ञान आपल्याला मागे टाकून इतकं पुढे गेलं असतानाही, शिवछत्रपतींचा आधुनिक काळातला पुतळा कोसळून पडतोच कसा? याचा सरळ अर्थ हा की, जेवढ्या वेगाने 'तंत्रज्ञान' पुढे गेलं...त्याहीपेक्षा, कितीतरी अधिक वेगाने भ्रष्टाचाराचं 'तंत्र', त्या तंत्रज्ञानाला मागे टाकून सुसाट पुढे निघून गेलंय.**

**भ्रष्टाचार प्रामुख्याने दोन प्रकारे होतो...पहिला प्रकार, टक्केवारीतून पैसा वसूल करुन (त्यासाठीच, हजारो कोटींचे पायाभूत-प्रकल्प घाईघाईने आणले जातात आणि त्याकामी, महाराष्ट्रासारख्या राज्यांमधली विरोधी-पक्षांची सरकारे आमदारांच्या थोबाडावर पैसा फेकून पाडली जातात)...आणि, दुसरा प्रकार, जो जास्त गर्हणीय व घातक आहे, तो म्हणजे गुणवत्तेशी तडजोड करुन चढत्या दराने आपल्याच 'बगलबच्च्यां'च्या पदरात कंत्राटं घालून!**

गेल्या १० वर्षांतले सगळेच सरकारी-कंत्राटदार तपासून पाहिलेत तर, कुणाचा संघाशी, कुणाचा सनातन-संस्थेशी; नाहीतर कुणाचा सरळसोट भाजपा किंवा मित्र पक्षांशी संबंध असल्याचं दिसेल...आणि, हेच लोक विरोधी-पक्षीयांवर ईडी, सीबीआय, आयटीची छापेमारी करणार?

जन्माने ठाणेकर नव्हे (ठाण्यात पोटापाण्याचा व्यवसाय व राजकारण नावाचा 'धंदा' करायला आलेले); तर, मूळचे साताऱ्याचे असलेले मुख्यमंत्री अथवा अन्य कोणी त्यांचे सरदार-बरकदार...शेकडो-हजारो मंडळांना (गणेशोत्सव, पूजा, दहीहंड्या, गरबे, भंडारे, खेळमहोत्सव इ. साजरी करणारे) जो एवढा, लाखो रुपयांचा चंदा, वर्षानुवर्षे देत आलेत आणि देत रहातील...तो शेकडो-हजारो कोटींचा पैसा त्यांच्याकडे येतो तरी कुठून, हे त्यांनी एकदा पारदर्शकपणे जाहीर करावंच...आहे हिंमत कुणाची?

एक गोष्ट, आम्ही 'धर्मराज्य पक्षा'च्या व्यासपीठावरुन छातीठोकपणे सांगतो...जे शिवछत्रपतींच्या पुतळ्याबाबत नौदलाकडून (म्हणजेच, मोदी-शहा या गुजराथी दुकलीच्या केंद्र सरकारकडून) आणि भाजपाई-संघीय महाराष्ट्र सरकारकडून घडलं (एकनाथराव काय किंवा अजितदादा काय...ते एकप्रकारे त्यांचे 'मांडलिक' सरदारच)...तसं, ते अहमदाबाद-मुंबई धावणाऱ्या 'बुलेट-ट्रेन'च्या बाबतीत कधिच घडणार नाही... तिचं बांधकाम सहजी कोसळणार नाही; कारण, ती मूलतः श्रीमंत-अतिश्रीमंत 'गुजराथी' भांडवलदारांसाठी आहे (आरक्षणासाठी तळमळणाऱ्या मायमराठ्यांसाठी नव्हे) आणि



गुजराथी लोकं आपापल्या भाषिक-जमातीची संघटितरित्या पुरेपूर काळजी घेतात...आपल्याच जमातीशी ते सहसा गद्दारी करत नाहीत.

**पण, आपल्याकडचे 'निर्लज्जम् सदा सुखी', असे हे कोडगे लोक, इतके निर्लज्ज झालेत की, काय तो डोंगर, काय ती झाडी म्हणणाऱ्यांच्या कातडीची 'जाडी' पाहून गेंड्याला पण शरम वाटावी...दाढ्या कुरवाळत महाराष्ट्राशीच द्रोह करण्याचं टक्केवारीचं किळसवाणं राजकारण, तसंच मागील पानावरुन पुढे आपण चालू द्यायचं किंवा नाही, हे ठरवायची वेळ आलीय.**

**...कधि नव्हे ती (न भूतो) शिवछत्रपतींचा पुतळा पडण्याची भयंकर अशी आत्यंतिक वेदनादायक घटना घडली...पण, मराठी-माणसांचे 'गोविंदा' क्षणभर तरी थांबले? वाटलं त्यांना थबकावसं?? निदान, प्रत्येक मंडळाने प्रत्येक गोविंदाच्या ठिकाणी, या भ्रष्टाचारातून घडलेल्या शिवछत्रपतींच्या अवमानाच्या घटनेचा 'निषेध' म्हणून दहीहंडी फोडण्यापूर्वी मान खाली घालून 'एक मिनिट स्तब्धता' नको होती पाळायला???**

ज्या शिवछत्रपतींनी मोगलांची सूरत लुटली, ते गुजराथी-भाषिक, आजचा मराठ्यांचा गोविंदाचा थरार नव्हे; तर, लाजिरवाणा थयथयाट पाहून आपल्याला मनातून खो खो हसत असतील. कालपरवा शिवसेना सहजी फोडून मा. उद्धवजींचं सरकार पाडलं गेलं...पुढे जाऊन शरदरावांची राष्ट्रवादी फोडली; आणि, आता भाजपा-संघाचा अभद्र हात, शिवछत्रपतींच्या पुतळ्यापर्यंतही पोहोचलाय? पुतळ्याचे नटबोल्ट सकट सगळा धातूच १० महिन्यात गंजायला लागतो, सूचना दिली जाते; तरीही, कुणी सरकार-पातळीवर दखल घेत नाही, याचा एकूणच अर्थ काय लावायचा? तरीही, आम्हाला काही वाटत नाही...'जनाची नाहीतर निदान मनाची' शरम नावाची 'चीज'च कुठे शिल्लक राह्यलीय आमच्यात??

...तेव्हा, **शिवछत्रपती, तुम्ही** ...पृष्ठ क्र. १० वर

खूप वेदना झाल्या. मला कळायला लागल्यापासून तरी मी ही पहिली घटना पाहिली की, छत्रपती शिवरायांचा पुतळा कोसळला आहे. तो ही थेट पंतप्रधानाच्या हस्ते अनावरण झालेला पुतळा! पुतळा एवढा जुना ही नाही की, नेहरुंच्या किंवा इंदिराजींच्या काळातला असावा... मोदीजींच्या हस्ते उद्घाटन झालेला पुतळा होता हा. दहा वर्षांपुर्वीचा नाही, अगदी कालपरवा...इलेक्शनच्या चारपाच महिने आधी...राममंदिराच्या दिड महिना आधी उभारलेला! त्यानंतर, फक्त २६६ दिवसांतच ही नामुष्की आणणारी दुर्घटना घडते?

यांच्या हस्ते उद्घाटनं झालेल्या विमानतळांची छतं कोसळताना आपण पाहिली...पूल कोसळताना पाहिले... पुलांना भेगा पडलेल्या पाहिल्या...बोगदे पाण्यानं तुंबलेले पाहिले...रस्ते खचलेले पाहिले...राममंदिराचा गाभारा गळताना पाहिला...नवीन संसदेचा मार्ग पाण्याखाली गेलेला पाहिला...नवीन संसद इमारतीच्या छताला गळती लागून बादल्या ठेवाव्या लागल्याचे लाजिरवाणे दृश्य पाहिले...जगापुढे शरमेने मान खाली जावी, अशा या घटना...पण, त्या सगळ्यावर या घटनेनं मात केली!

त्यांना टीकाकार 'पनौती' वगैरे म्हणतात, ते मला अजिबात आवडत नाही. एक तर असं कुणाला म्हणणं चुकीचं आहे. पनौती ही अंधश्रद्धा आहे. एकदा दुर्दैवावर गोष्ट ढकलून दिली की, आपण यामागचा कार्यकारण-संबंध शोधणं सोडून देतो. नेहरुंच्या काळापासून बांधलेले पूल, रस्ते, इमारती आणि पुतळे सत्तर-पंचाहत्तर वर्षे भक्कम उभे असतात...आणि, आजकाल गाजावाजा करत, प्रचार करत हजारो करोड खर्चून, स्पेस-टेक्नॉलॉजी वापरुन बांधलेलं सगळं, एका वर्षाच्या आत पत्त्याच्या बंगल्यागत कोसळतं, याचं कारण पनौती नसतं... तर मग नेमकं काय असतं? ते असतं, भ्रष्टाचार, घोटाळे आणि निकृष्ट बांधकाम, बस्स्!

दुसरं काहीही नाही. 'पनौती' म्हणून हसण्यावारी नेण्यापेक्षा आपण तर्कशुद्ध विचार करुया...हा भ्रष्टाचार आता थेट छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याच्या बाबतीतही होऊ लागला, हे भयानक आहे ! स्वातंत्र्यानंतरच्या पाऊणशे वर्षांतल्या भ्रष्टाचाराच्या होत्या-नव्हत्या त्या सगळ्या मर्यादा, आज ओलांडल्या गेल्या आहेत. कहर झाला आहे...धोक्याची घंटा आहे ही...भ्रष्टाचाऱ्यांच्या विळख्यात संपूर्ण देश जखडला गेल्याचा, हा सिग्नल आहे.

आता तरी होई जागा...तुका म्हणे पुढे दगा!

*...किरण माने*

...पृष्ठ क्र. ९ वरुन

**तुमच्या आयुष्याचा आमच्यासाठी होम केलात, त्या त्यागाला–धैर्याला गौण ठरवत...एवढंच काय तर, तुमच्याच पावलावर पाऊल ठेऊन केवळ नव्हे; तर तुम्हालाही काकणभर सरस ठरणाऱ्या तुमच्या सुपुत्राच्या, छत्रपती संभाजीराजांच्या बलिदानालाही गौण ठरवत... आज तुमचा पुतळा भ्रष्टाचाराच्या नादान–तिर्थी धाराशायी पडलेला असतानाही आम्ही 'गोविंदा गोविंदा' करत पावसात न्हालो–नाचलो. त्यातले किती 'कायम'स्वरुपी नोकरीत आहेत आणि त्यातले किती ५० हजारांहून अधिक पगार घेतात? तसा एकतरी 'यशोदामाय का लाल' आजच्या गोविंदातला दाखवून द्याच! 'कंत्राटी–कामगार' नव्हे; गुलाम व नवअस्पृश्य असलेले आमचे 'गोविंदा'वाले, कुण्या राजकारण्याने, या असल्याच सार्वजनिक भ्रष्टाचारातून कमावलेल्या काळ्या पैशातून फुकटात वाटलेल्या, टीशर्ट्स आणि बक्षीसांसाठी, जीवावर उदार होताना पाहून शिवछत्रपतींच्या अंतःकरणाला किती यातना होत असतील...कुठल्या तोंडाने सांगू आम्ही महाराज तुम्हाला की, आमच्या नादान मराठी–तरुणाईला माफ करा म्हणून?**

फुकटेपणाची भिकारटुकार संस्कृती थांबवा...अतिरेकी दारुबाजी, अतिरेकी जुगारी वृत्ती थांबवा...त्या घातकी वृत्तीनेच, सिंधुदुर्गी शिवछत्रपतींचा पुतळा धाराशायी होण्यापूर्वीच, तुमच्या अंतःकरणातला 'शिवछत्रपती' तुम्ही मारुन टाकलाय. हो, शिवछत्रपतींचे पहिले 'मारेकरी' तुम्ही स्वतः आहात... आणि, मगच ते सूरत ते गोवा व्हाया गुवाहाटी प्रवास–फेम एकनाथ शिंदे, 'मुख्यमंत्री ते उपमुख्यमंत्री' असा अधोगतीचा प्रवास करणारे पाताळयंत्री देवेंद्र फडणवीस आणि नरेंद्र मोदी व (शरद पवारांच्या शब्दात सांगायचं तर 'तडीपार') अमित शहा यांची अनुक्रमे महाराष्ट्रातील आणि केंद्रातील सरकारं आहेत!

पण, तुम्ही ते करणार नाही...तुम्ही एवढे नादावलेले आहात की, राजकारण्यांनी फुकट वाटलेली दारु, आपल्यापैकी अनेक गोविंदा पोटात ढकलतील आणि सगळेच मिळून थयथया नाचाल....तुम्हाला अशावेळी भान पण शिल्लक रहाणार नाही की, नाचताना पायाखाली आपल्या काय तुडवलं जातंय...पायाखाली, राजकारण्यांनी खात्यात टाकलेल्या लाडकी बहीण, लाडका भाऊ योजनेतल्या करकरीत नोटा तुडवल्या जातायत की, निवडणुकीदरम्यान घरोघरी वाटलेल्या चकचकीत पाकिटांतून थोबाडावर फेकलेल्या टक्केवारीतल्या टकाटक नोटा तुडवल्या जाताहेत...की, ...की, पायाखाली भ्रष्टाचारी राजवटीला उघडं पाडत, सिंधुदुर्गच्या किल्ल्यातील उताणा पडलेल्या शिवछत्रपतींच्या भग्न पुतळ्याचे अवशेष तुडवले जातायत...तुम्ही नाचा, असेच बेभान होऊन नाचा!

घागर उताणी रे गोविंदा, म्हणत थयथया नाचत गोविंदा करणाऱ्यांनो, घ्या गुजराथी–भांडवलदारांकडून (दुकानदार, कंत्राटदार, कारखानदार, कॉर्पोरेटवाले...एकूणएक सगळेच) 'चंदा'! तुमचा तो पिढीजात वसुलीचा उघडानागडा धंदा, आता काहीही झालं तरी थांबणे नाही. शिवछत्रपतींनी, संभाजी महाराजांनी, म. गांधींनी, बाबासाहेबांनी शिकवलं...तसं, संघर्ष करुन हक्काचं काही मिळवायची दानत तुमच्यात नाही, 'भांडवली व्यवस्था–बदल' घडविण्याची हिंमत नाही...फक्त, कुठल्यातरी राजकीय–पक्षाचा टिळा लावून, 'जय शिवाजी, जय भीम' करत फुकटेपणाचा मळवट भरुन मिरवायचं, हेच ते तुमचं कार्यकर्तेपण! शिवछत्रपतींच्या आणि बाबासाहेबांच्या जयंति–मयंतिप्रित्यर्थ नशा करुन वर्गणी मागत 'चंदा' गोळा करण्याच्या धंद्याचा मोह तुम्हाला चारही बाजुंनी खुणावतच रहाणार, तो मोह तुम्हाला आवरत नाही...सर्वनाश झाल्याखेरीज आवरणारही नाही; कारण, त्यातूनच तुमचं आजचं तथाकथित 'कार्यकर्तेपण' उभं रहातंय...ज्यांनी तुम्हाला ती घातकी सवय लावली; ते त्यांचं राजकारण यशस्वी करुन गेले; पण, ही अवसानघातकी–परंपरा मागे ठेऊन गेले. कदाचित, त्यांना पुढील परिस्थिति महाराष्ट्रावर काय ओढावेल, याचं नीटसं आकलन झालं नसेल (त्यांचा हेतू वाईट नसेलही...केवळ, तुम्हाला संघटित करण्याचा असू शकेल)...गोपाळ गणेश आगरकरांना सार्वजनिक–गणपती रस्त्यावर आणून ठेवला; तर, काय होऊ शकेल, याचं यथास्थित आकलन झालं होतं... पण, पारतंत्र्यात थंडगोळा बनलेल्या जनतेला ऊब देण्यासाठी लो. टिळकांना त्यावेळेस त्याची अपरिहार्यता जाणवली होती; पण, त्या उदात्त हेतूचं, त्या परंपरेचं पुढे काय झालं, ते आजचं तुमच्याआमच्या पुढचं काळंकुट्टं वर्तमान दत्त म्हणत उभं आहे...त्यातलाच हा प्रकार!

**ही अवसानघातकी परंपरा त्यागाल, त्यजाल... तेव्हाच, तुमच्या डोक्यात खरा प्रकाश पडेल; तोपर्यंत, अंधारयुगातच समाधान मानत रहा, जातीपातींचा सावल्यांचा खेळ खेळत बसा...सन्मानाचा प्रकाश तुमच्या नशिबी नाही; कारण, त्याकामी जातीपाती–धर्मभेदाचाही प्रसंगी त्याग करावा लागेल...किमानपक्षी, मी महाराष्ट्राचा आणि महाराष्ट्र माझा, हा सच्च्या अंतःकरणाने मंत्र जपत, आपले मायमराठ्यांचे मूलभूत जगण्याचे हक्क...या भांडवली–व्यवस्थेकडून राजकीय–जागृती दाखवून, सनदशीर संघर्ष करुन व जागरुकपणे मतदान करुन हिसकावून घ्यावे लागतील...तरच, तो हक्काचा–सन्मानाचा प्रकाश तुमच्या जीवनात उतरेल; अन्यथा, तो तुमच्यासाठीही नव्हे आणि तुमच्या पुढील पिढ्यांसाठीही नसेल.**

लक्षात ठेवा, महाराष्ट्र ही पावनभूमि...तिच्यात धर्म चांगला रुजतो–वाढतो म्हणून, गुजराथचे कृष्णभक्त चक्रधरस्वामी, गुजराथची 'भांडवली'वृत्तीची 'पातकी–भूमि' सोडून महाराष्ट्रात आले...मोहनदास करमचंद गांधी नावाचा 'महात्मा' याच कारणासाठी गुजराथचा 'साबरमती–आश्रम' सोडून कायमचा महाराष्ट्राच्या वर्ध्यात स्थायिक झाला; कारण, पुन्हा ते आणि तेच! फरक एवढाच की, चक्रधरस्वामी जातीभेदविरहीत 'धर्मकार्य' करण्यासाठी आले होते; तर, म. गांधी 'राष्ट्रकार्य' करण्यासाठी!

...पण, दुर्दैव आहे त्या शिवबा–संतांच्या महाराष्ट्राचं की, आम्ही आमच्या हातानेच आमची 'पावन–भूमि' नासवायला घेतलीय आणि ती प्रक्रिया आता मराठी–हिताचा सर्वनाश होईपर्यंत थांबणे, शक्य वाटत नाही! मुंबई, ठाणे, पुणे, रायगड, नाशिक, नागपूर सगळंच त्या गुजराथी–भाषिक भांडवलदारांच्या घशात घालून, त्यांच्याचकडून भिका मागत मिळवलेल्या पैशावर आमचे गणेशोत्सव, सार्वजनिक पूजा, दहीहंड्या, गरबे, भंडारे असेच पुढे तोपर्यंत साजरे होत रहातील; जोपर्यंत, ती शिवरायांची आणि भीमरायांची पावन–मराठीभूमी संपूर्ण सडूनकिडून जात नाही... जोपर्यंत, आमचं 'मराठी–अस्तित्व' कंत्राटी–कामगार पद्धतीच्या 'गुलामगिरीत व नव–अस्पृश्यते'च्या अंधःकारात पूर्णतया ढकललं जाऊन दीडदमडीचं बनत नाही!

नित्यनेमाने आम्ही उत्सवांसाठी वर्गणी गोळा करायला गुजराथी–भाषिक भांडवलदारवर्गाकडे जातो, आरपार भ्रष्ट असलेल्या राजकारण्यांकडे जातो...पण, आम्हाला हे माहितच नसतं की, त्यांनी तो अतिरिक्त पैसा, तुमच्याच खिशात तुमच्याच नकळत दिवसाढवळ्या कसलेल्या 'पाकिटमारा'सारखा हात मारुन नेलेला असतो...हे 'चौर्यकर्म', जोवर या देशात आजची ही अपरिमित शोषण करणारी लुटारु 'भांडवली–व्यवस्था' आहे; तोवर, भांडवलशाहीचा तो 'अदृश्य हात'...तुमची 'पाकिटमारी' सुखनैव विनाअडथळा कायम करत रहाणार!

**आजचा दिवस कृष्ण–कन्हैय्याचा...सर्वांभूति प्रेम करत सगळ्यांसाठी न्यायनीतिचं 'आनंदाचं गोकुळ' निर्माण करत, आनंदानं मौजेत जगण्यासाठी आणि 'सत्कर्म' करत रहाण्यासाठी प्रेरित करणाऱ्याचा! श्रीकृष्णाचा 'कर्मसिद्धांत' आम्ही विसरलो...'कष्टानं आणि संघर्षा'नं आम्हाला काही मिळवायचं नाही... शिक्षण, आरोग्य, वहातूक यासारख्या सार्वजनिक–सेवा दर्जेदार–विनाशुल्क मिळाव्यात, चांगलंचुंगलं किमान–वेतन मिळावं आणि परवडणारं हक्काचं किंवा सिंगापूर वगैरे प्रमाणे उत्तम दर्जाचं व वाजवी भाड्याचं डोक्यावर 'घराचं छप्पर' असावं, ही आमची मागणी नसते... तो आमचा आग्रह नसतो; कारण, एकतर आमची राजकीय–समज तोकडी पडते आणि भरीला 'फाजिल–उत्सवप्रियते'चं हळूवार रक्तात भिनणारं विष** (Slow Poison), **आम्हाला राजकारणी लोकं कौशल्याने सतत पाजत असतात, म्हणूनच!**

...आम्ही अशा राजकारण्यांसाठी 'लाडके बहीणभाऊ' वगैरे नसून, लाकडाचे–कचकड्याचे 'बाहुले' आहोत, हे बेरकी राजकारण्यांनी अचूक ओळखलेलं असतं, तिचं आमची लायकी. आम्ही बिनकामाचे फुकटे आहोत, फुकटे रहाणार आणि फुकटे म्हणूनच मरणार...जी गत शिवछत्रपतींच्या पुतळ्याची झाली; तिचं गत, आमची आजही आणि उद्याही होत रहाणार...आमच्या सर्वसामान्य मराठी–जगण्याची, हीच काय ती एकूण गोळाबेरीज!

***...राजन राजे***

**भांडवलशाहीचे 'दलाल' असलेले निदान पोटासाठी (ज्यासाठी ते बाजू सहजी बदलूही शकतात); तर, 'पुरस्कर्ते' स्वयंप्रेरणेने जाणिवपूर्वक 'साम्यवाद व समाजवादा'ने प्रेरित झालेल्या वा होऊ शकणाऱ्या समाजाच्या अंतःप्रेरणा, मुळातूनच साफ मारुन टाकण्याचं काम (Nipping in the bud) करत असल्याने...ते वस्तुतः फार मोठा सामाजिक–अपराध करत असतात व तो प्रज्ञापराध क्षम्य नव्हेच! मानसशास्त्रज्ञ सिग्मंड फ्रॉईड म्हणतो ''माणूस, सदैव दुःखीच रहाणार... 'लैंगिक वासना' उन्मुक्त ठेवल्या; तर, प्राण्यांसारखे लैंगिक–व्यवहार (ज्याला डार्विनची मान्यता होती) होऊन अशांति, दुःख निर्माण होईल व त्यांचं धर्म–संस्कृती–अध्यात्माच्या नावाखाली दमन केलं; तरीही, माणूस अस्वस्थ राहून शेवटी दुःखीच होणार''! म्हणून, 'बुद्धविचार' इथे महत्त्वाचा ठरतो...**

**...राजन राजे (भाई)**

# The 78th Independence Day and the 'Industrial-Scenario' of the Present Day...!!!

The conclusion of the 16th Loksabha Election, was aptly termed as the 'Rockefeller Moment' for Corporate-India. The real economic power-shift towards 'Crony-Capitalists' or Oligarchs, gave rise to the damned reality that the real stream of power started flowing from the Corporate-Club 2.0.

The way, Seeta in Ramayana was hijacked by demon Ravana, the same way, democracy' was hijacked by 'Crony Corporate-Demons' and had replaced 'Corporatalism' with 'Corporate-Terrorism', where the outcry of millions and billions of hearts, went unheard! Thus, the "fusion of corporates with governance" has led to 'fascism' in India, obliterating the mechanism of democracy!

**The Contract-Labour System, which finds its roots in this power-shift, has created gold-mine for the entire political apparatus, by allowing them to grab lucrative labour-contracts on one hand and on the other hand, the 'virus' of 'contract-labour system' has given birth to a pathological condition called 'Industrial-Silence', across the industrial map of India... A 'silence' to be found in graveyards, never to be mistaken for the welcome 'peace', one finds in a temple, buddha-vihar, church, gurudwara or mosque.**

Flexible or cheap-labour like 'contract-labour' are being ceaselessly used like 'tissue papers' ('use & throw' policy) and are getting exploited rampantly day in and out, as they have been completely 'silenced'!

**'Contract- labour system' and it's criminal extension through 'OutSourcing' has helped the corporate-world to keep wages at abysmally low levels and instil a sense of 'instability and insecurity' among the ranks and files of working-class.**

Through the opening of the Pandora's box of 'contract-labour system', new form of 'slavery' and 'neo-untouchability' got unleashed. Major chunk of the working-class was forcibly pushed to the periphery of the development-process, sans 'social-engineering', which rather than being 'inclusive' has become 'intrusive' on human basic rights and the nature, at large. It is a perfect process of 'socio-economic participatory exclusion' of the masses and equally hazardous for the environment, at the same time. Hence, this 'law of the jungle' has been aptly termed by Nobel laureate Amartya Sen as "India is islands of California, in a sea of Sub-Saharan Africa!"

In a way, we were drawn into the vortex of the dangerous game of working on 'human weakness', rather than on 'human strength', which as a thumb rule, is most easy to play; but, most explosive to sustain. The clock of the human civilisation was thus, made to turn 180° in the opposite direction and the 'law of jungle', where 'might is right' has prevailed! As a sequel to the 'law of the jungle', the 'coalition' of 'smart and connected' people has gained the earth; whereas, the weaker and scattered have been pushed to the wall.

**All this has allowed corporates to compete with each other in terms of exploiting employees to the ultimate extent...the more they do so, more their inefficiencies, insatiable greed and corrupt practices remain hidden under it. It is an ironclad truth that these days, it is hard to find 'price wars' in the open-market competition, There is always a tacit understanding amongst the competing corporates, regarding this... the real time competition happens only on the fronts of 'exploitative measures' and 'marketing gimmicks'. On the exploitative front, 'Contract-Labour System and OutSourcing' are the most devilish and all pervasive, newfound tools, in the hands of corporate-sharks. Criminal conspiracy between the corporates, all party politicians, judiciary, and the local labour-department officials (ensuring complete fudging of the records of the contract-labour, engaged in the production or service sectors, in blatant violation of the contract-labour abolition and regulation act), is an all round regular phenomenon...**

Directive Principles of State Policy (DPSP), ingrained in our constitution, laying stress particularly, on promotion and protection of economic interests of the downtrodden, have been heavily compromised through criminal-conspiracy between political and capitalist domain of our country. Corrosive effects of malevolent and ominous corporate-influence on public policy, political-processes and especially, on the environment are glaringly open to anybody's scrutiny, who is still left with some remnants of sensitivity.

Not only the working-class belonging to this generation, but the future generations, are also put to severest of risks and the carcinogenic effect of this exploitative-technique, has eventually spread its tentacles, beyond 'blue collar' to the 'white collar' employees...the long term implications of which are portentous for India, if not for the world.

Inequality is sharply rising since 2014. As per the recent Oxfam report, the top 1% In India holds more than 40% wealth, creating a 'Billionaire Raj'!

Developed contries like Japan or Korea hardly have the kind of blood-billioners India has...solely because, the inheritance ends almost after fourth generation, owing to the progressive and coercive 'rates of inheritance-tax'!

**With 77 years completed, we are now entering into the 78th year of independent India, when we have to ask ourselves "whether the soul of a nation, long suppressed has really found utterance or wether we have been able to fulfill a pledge to bring freedom and opportunity to the peasants and workers, who are the real 'wealth-creators' of our nation?"**

**India has been able to create unparalleled wealth, in almost few decades...we have created wealth to the tune that our country could never think of creating in centuries. But the 'distribution of wealth' has been totally lopsided and grossly uneven. This has given rise to the inhuman 'income disparity or inequality' across the length and breadth of our country, spawning fleet of 'blood-billioners'!**

The workers and farmers of India were promised 'trickle-down theory', once the enormous wealth through LPG Policy (Liberalisation, Privatisation and Globalisation) could have happened...a promise, that was never fulfilled, instead workers were handed out 'neo-slavery and neo-untouchability' through rampant spread of 'contract-labour system'. The complete and full-proof subjugation of the entire working-class, with the spread of an extremely virulent 'virus' of Contract Labour System... clearly exposes the transition of corporate-culture from 'Corporatalism to Corporate-Terrorism'.

So the independence either can be said to have not reached the lower most strata of society i.e. working-class or if at all, it had ever reached...it has been snatched away slowly after the advent of LPG era by the present day 'Vampire-State System'...!!!


***...Rajan Raje***

बच्चा लाल 'उन्मेष', या नवोन्मेषधारी नवनवतरुण हिंदीभाषिक दलित कवीची छिछले प्रश्न...गहरे उत्तर... ही ग्रामीण भागातील (विशेषतः, उत्तर भारतातील) दलितांच्या जगण्याचा सडेतोड 'हिशोब' मांडणारी आणि जातीव्यवस्थेच्या क्रूर तटबंदीसकट,'भांडवली–व्यवस्थे'शी 'हातमिळवणी' करुन बसलेल्या व आजमितीस भयंकरच निर्ढावलेल्या 'दलित–राजकारणा'लाही प्रचंड धडका देणारी, ही कविता आहे... विलक्षण प्रतिभेसोबतच, स्वभावात कमालीची नम्रता–ऋजुता असलेला हा कवी, या कवितेच्या शब्दाशब्दातून तुमच्या हृदयातल्या संवेदनेचा तळ केवळ ढवळूनच काढतो असं नव्हे; तर, शब्दशः तो खरवडून टाकत, तुम्हाला कमालीचा अस्वस्थ करुन सोडतो... आणि, म्हणूनच वणवा पेटल्यागत लाखो लोकांपर्यंत पोहोचलेल्या या कवितेवर, खडबडून जाग्या झालेल्या भाजपा–संघीय भांडवली–व्यवस्थेने 'इन्स्टाग्राम'वर लागलीच 'बंदी' घालण्याची चोख व्यवस्था केलीय... महाराष्ट्रातल्या 'हितसंबंधी' दलित–राजकारण्यांनी, या कवितेला मोकळा 'अवकाश' बहाल केला नसला; तरीही, ही कविता, 'धर्मराज्य पक्षा'च्या व्यासपीठावरुन जशीच्या तशी आपल्यासमोर सादर करताना, आमच्या अल्पस्वल्प मतीनुसार, तिचा अतिशय 'स्वैर' असा मराठी अनुवादही, आम्ही मराठी–वाचकांच्या सेवेशी सादर करतोय...धन्यवाद!

## छिछले प्रश्न...गहरे उत्तर...

कौन जात हो भाई?
दलित हैं साब...
नहीं, मतलब किसमें आते हो?
आप की गाली में आते हैं,
गंदी नाली में आते हैं,
और, अगल की हुई थाली में आते हैं,
साहब...
मुझे लगा हिंदू में आते हो!
आता हूँ ना साहब,
पर आप के चुनाव में....
क्या खाते हो भाई?
जो दलित खाता है साहब...
नहीं मतलब क्या क्या खाते हो?
आप से मार खाता हूँ,
कर्जे का भार खाता हूँ,
और तंगी में नून तो कभी अचार खाता हूँ
साहब!
मुझे लगा मुर्गा खाते हो....
खाता हूँ ना साहब,
पर आप के चुनाव में....
क्या पीते हो भाई?
जो दलित पीता है साहब,
मतलब क्या क्या पीते हो?
छुआछूत का गम,
टूटे अरमानों का दम,
और नंगी आँखों से देखा गया सारा भरम
साहब...
मुझे लगा शराब पीते हो....
पीता हूँ ना साहब,
पर आप के चुनाव में....
क्या मिला है भाई?
जो दलित को मिलता है भाई,
मतलब क्या क्या मिला है?
जल्लत भरी जिंदगी,
आप की छोडी हुई गंदगी....
और इसपर भी आप जैसे परजिवीयों की
बंदगी साहब....
मुझे लगा वादें मिले हैं!
मिलते हैं ना साहब,
पर आप के चुनाव में....
क्या किया है साहब,
जो दलित करता है साहब,
नहीं मतलब क्या क्या किया हैं?
सौं दिन तालाब में काम किया,
पसीने से सुबह को शाम किया,
और आते जाते ठाकूरों को सलाम किया
साहब,
मुझे लगा कोई बडा काम किया!
किया हैं ना साहब,
आप के चुनाव का प्रचार...!!!

*– बच्चा लाल 'उन्मेष'*




## उथळ प्रश्नं.....सखोल उत्तरं!

कुठली रे जात तुझी?
दलित आहे साहेब,
नाही, म्हणजे नेमक्या कुठल्या
जातीतला?
ज्यांना तुम्ही तुच्छ लेखता, शिव्यांमध्ये
मोजता...
जे दुर्गंधीने भरलेल्या गटारांमध्ये
सापडतात,
...आणि, जेवणाचं ताट तुम्ही वेगळं
ज्यांचं ठेवता,
त्याच जातीत मोडतो हो...
मला वाटलं तू कुणी हिंदुंमधला
असशील...
हो तर, पण फक्त निवडणुकीच्या
वेळेसच....
काय काय खातोस बाबा?
जे एक दलित खातो तेच....
तसं नाही, म्हणजे नेमकं काय काय
खातोस?
आपल्यासारख्यांकडून मार खातो,
कर्जाचा भार वहातो,
...आणि, अगदीच खिशात दमडी नसली
तर,
कोरडी चपाती, जमलंच तर लोणचं
लावून खातो....

माझा आपला एक समज की,
तू कोंबडीचं मटण वगैरे खातोस की
काय....

खातो की...पण ते तुमच्या निवडणुकी
दरम्यानच!
मग, पितोस तरी काय बाबा?
जे एक दलित पीत असतो तेच,
साहेब....
तसं नव्हे, म्हणजे, नक्की काय काय
पितोस हो?
अस्पृश्यतेचं जाळून काढणारं दुःख आणि
वेदना,
कोळपलेल्या आशाआकांक्षा....
...आणि, उघड्यानागड्या डोळ्यांच्या
खाचांमध्ये
टिच्चून भरलेले भ्रम,
तेच कोळून पितो....
मला वाटलं, दारुबिरु पितोस की काय!
हो, ती ही पितो की साहेब,
...पण तुमच्या निवडणुकीच्या काळातच,

काय काय मिळालं रे तुला आजवर?
जे दलितांना मिळालं, तेच की....

...नाही म्हणजे, काय काय हाती लागलं
रे तुझ्या?

तिरस्कार–अपमानानं भरलेलं बहिष्कृत
जीणं,
त्यात भरीसभर म्हणून,
तुम्ही आमच्यासाठी मागे ठेवलेली
दुर्गंधी....
...आणि, ते ही कमी पडलं म्हणून की
काय,
समाजवृक्षावर उगवलेल्या....
तुम्हा बांडगुळांच्या मनोभावे सेवेचं वाण!
मला वाटलं, तुला उज्वल भविष्यासाठी,
भरभक्कम आश्वासनं–वचनं वगैरे मिळालीत
की काय?

...मिळतात ना साहेब, पण तुमच्या
निवडणुकीच्याच धामधुमीत!
सध्या काय काम करतोस, बाबा?
जे एक दलित करतो, तेच की....
नाही म्हणजे, नेमकं काय काय केलंस?
वर्षाचे शंभर दिवस तलावाचं खोदकाम,
रोज उगवणारी शुभ्रसकाळ, घामाच्या
धारांनी भिजवत
संध्याकाळच्या कृष्णछायेनं रंगवली....
...आणि हो, घरी जाता जाता न चुकता
ठाकुरांना सलामही ठोकला!
मला वाटलं, काही मोठंसं काम केलंस
की काय?
केलं की साहेब, नाही कसं म्हणता!
...तुमच्या निवडणुकीचा प्रचार...!!!

*– बच्चा लाल 'उन्मेष'*

*त्यातही, निसर्गाची लेकरं म्हणून निवांतपणे जगणाऱ्या मूळ स्थानिकांची तर, फारच कुतरओढ होत जाते. हाँगकाँगसारख्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या शहरातील मूळ स्थानिक कोळी तरुण, पोहणाऱ्या माशांची भित्तीचित्रे जागोजागी रेखाटतात; त्यातून, आम्हाला पोहत रहाणाऱ्या माशासारखं पोटासाठी २४ तास सतत काम करावं लागतं; अन्यथा, या महागड्या शहरात निभाव लागणं कठीण...हे त्यांना सूचित करायचं असतं. एकाबाजुला नोकऱ्या, कंत्राटी–कामगार पद्धतीतल्या गुलामगिरीत अळवावरच्या पाण्यासारख्या औटघटकेच्या बनलेल्या असतानाच गुलामगिरीतल्या तुटपुंज्या पगाराने जनसामान्यांची 'निवृत्ती', ही हक्काची विश्रांती, इतिहासजमा झालेली. चुकूनमाकून निवृत्तीपर्यंत एखाददुसरी नोकरी टिकलीच; तरीही, तत्काळ दुसरी कुठलीतरी किडूकमिडूक नोकरी–धंदा करावाच लागतो.*

*...राजन राजे (भाई)*

# महाराष्ट्राच्या विवेकाला पक्षपाताचा झटका...

आता कुठे आहेत दुतोंड्या शरद पोंक्षे आणि केकाटणारी फालतू केतकी चितळे...???

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा भ्रष्ट राजकारणी लोकांच्या निर्लज्ज स्वार्थामुळे पडला, ह्यामागे भाजपाच्या अब्रूची लक्तरे आता वेशीवर टांगली गेली आहेत, हे एव्हाना महाराष्ट्राला ठाऊक झाले आहे !

सदानकदा हिंदू संकटात, पुरोगामी हिंदूच हिंदूंचे वैरी असे कंठरवाने बोंबलणारे शरद पोंक्षे ह्यांच्या जीभेवरील शारदा, आता अंदमानला गेली की काय ??

...आणि केकाटत आक्रस्ताळेपणा करत हिरव्या रंगाचा अर्थ समजावून सांगणारी 'चेटकी' चितळे आता कुठे अरण्यरुदन करत बसली आहे ??

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या संकल्पनेपासून ते त्याचे बांधकाम, अनावरण करणारे सर्व हिंदूच आहेत ना??

**आता बोला ना पोंक्षे की, हिंदूच हिंदूंचे दुश्मन आहेत आणि खरे हिंदू असाल तर सार्वजनिक बांधकाम खात्यापासून सर्वांची नावे व्याख्याने घेऊन घेऊन जाहीर करा; परंतु, स्वतःच्या दुर्धर आजारात उद्धव ठाकरे ह्यांनी केलेली मदत विसरुन, कृतघ्न माणसासारखे फणा काढून डसणारे पोंक्षे ह्यांच्याकडून काय अपेक्षा करणार? शिवरायांचा उपमर्द करणाऱ्या, त्याची विटंबना करणाऱ्या लोकांविरुद्ध बोलण्याची? गांधी ह्यांच्या टीकेचे धनी आणि सावरकर ह्यांचे मुकुटमणी !!**

**ह्या असल्या ब्राह्मणांनी, ह्यांच्या विकृत चाळ्यांनी आणि पक्षपाती बुद्धीने, महाराष्ट्राच्या विवेकाला पक्षपाताचा झटका आणलेला आहे.**

संघीय वृत्तीची ही नीच मानसिकता आपल्याला समजून घेणे गरजेचे आहे. उद्या दहीहंडीत जखमी झालेले गोविंदा दिसतील त्यात आमच्या ब्राह्मण समाजातील असा एक वरच्या थरावरून पडून जखमी झालेला एकतरी कुलकर्णी, साठे, पेठे, आपटे, पटवर्धन दाखवा. एकही दिसणार नाही... पण, हिंदुत्वाचे धडे तुम्हाला द्यायला आणि त्यासाठी उत्सव जपून, डोकी फोडायला तुम्हाला हे प्रवृत्त करतील.

आमच्यासारख्या लोकांनी विरोध केला की, आम्ही संस्कृती-भक्षक आहोत, हे बोंबलून सांगतील.

उद्याच्या जखमी मुलांमध्ये बहुजन समाजातील मुले असतील, कारण सध्या बहुजन समाज हाच मूर्ख बनत चालला आहे.

**नव्याने शिकणारा ब्राह्मण समाज गोंधळलेला म्हणजेच, confused आहे. थोडाफार दलित समाज तरी sorted म्हणजेच सुस्पष्ट वाटतो. शेतकऱ्याच्या शेतातील तृणासही हात लावू नका, असे सांगणारे आमचे नीतिमान महाराज, त्यांचा पुतळा उभारणारे अनितीमान, भ्रष्ट राजकीय नेते हे आज हिरो, हिरॉईन ह्यांच्याबरोबर दात काढत, खिदळत दहीहंडी साजरी करत होते. कालच आपल्या भ्रष्ट कारभारामुळे महाराजांचा पुतळा पडला, ह्याची लाज, लज्जा, शरम कोणत्याही संबंधित राजकीय व्यक्तीच्या चेहऱ्यावर दिसत नव्हती.**

इथे आमच्या महाराष्ट्राच्या खऱ्या हिरोचा, आमच्या महाराजांचा पुतळा पडलाय आणि तुम्ही गौतमी पाटील काय नाचवताय ? डिजे काय बडवताय ? शरम विकून खाल्ली की, असे होते !

संघाच्या कोणत्याच व्यक्तींनी, मोहन भागवत वगैरेंनी अजून निषेध नोंदवलेला नाही. संघाचे बाकी भारीच काम सुरु आहे. लोकमान्य टिळकांच्या हाती काँग्रेस असेपर्यंत ह्यांना आनंद होता...कारण, पेशवाई बुडाली आणि इंग्रज आले तर इंग्रजांविरुद्ध सत्ता, ही ब्राह्मणांच्या हातात हवी (गोखल्यांची सायकल गांधींनी का घेतली ?? ) इथून ह्यांचा द्वेष सुरु होतो.

१९२३ साली हे संघाचे लोक मुसोलिनीला इटलीला जाऊन भेटले आणि मुसोलिनीच्या ब्लॅक शेड आर्मीच्या धर्तीवर ह्यांनी काळी टोपी धारण करुन राष्ट्रीय स्वयंसेवक बनवला.

संघ ही मुळात ब्राह्मणांची विकृती आहे आणि त्यातून निर्माण झालेला चावटपणा म्हणजे भारतीय जनता पार्टी (माझ्या ब्राह्मण नातेवाईकांनी आणि मित्रांनी मला माफ करावे, पण हेच सत्य आहे) काळा रंग आपल्याला वर्ज्य आहे पण, टोपीसाठी तोच निवडला गेला...कारण, मुसोलीनीच्या ब्लॅक-शेड आर्मीची टोपी काळी... आणि, तिथून आल्यावर १९२५ साली ह्यांनी संघाची स्थापना केली.

ह्यांना इटालियन मुसोलिनी चालला; पण, रीतसर विवाह करुन भारतात आलेली इटालियन बाई सोनिया गांधी चालत नाहीत.

**तेव्हाचे डॉक्टर हेडगेवार, हे माणसांचे डॉक्टर होते आणि आताचे मोहन भागवत हे गुरांचे डॉक्टर आहेत... ही आहे संघाची शैक्षणिक परंपरा !!**

अच्युतराव वैद्य नेहरुंना आणि काँग्रेसला दूषणे देत...तो साला कुरुलकर, नेहरु आणि काँग्रेसचा द्वेष करत, सावरकरांवर व्याख्याने द्यायचे. गंमत बघा, वैद्य हे नेहरुंनी स्थापन केलेल्या BRC मध्ये कामाला आणि हा कुरुलकर, नेहरुंनीच स्थापन केलेल्या DRDO मध्ये कामाला होता.

अडचण आज अशी आहे की, पूर्वी नेते शिकलेले होते आणि जनता अडाणी होती, आज जनता 'शिकलेली आहे आणि नेते अडाणी आहेत.

**आज ह्या भारतीय राजकारणात राहुल गांधी, हा एकच आश्वासक चेहरा आहे... जो आजी आणि वडील मारला गेल्यानंतर लढतो आहे. साडेतीन हजार किलोमीटर भारत चालून तुम्हाला घाम फोडतो आहे...असो.**

तुमच्या पापाचा घडा आता भरला आहे. शिवरायांचा पुतळा पाडण्याचे पातक जे तुम्ही केले आहे ना, महाराष्ट्रातील जनता त्याचा कडेलोट केल्यावाचून राहणार नाही.

***....राज गोखले***

---

## हुकूमशहांना एकतर देश सोडून पळावं तरी लागतं किंवा त्यांना आत्महत्या तरी करावी लागते, नाहीतर जनतेच्या हातून ते मारले जातात...

बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनाही देश सोडून पलायन करावं लागलंय. पाहायला गेलं तर, शेख हसीना या बांगलादेशच्या निवडून आलेल्या पंतप्रधान असल्या तरी, त्या ठरवून आलेल्या हुकुमशहा होत्या. मागच्या निवडणुकीत बांगलादेशातील एकाही विरोधीपक्षाने निवडणूक लढविली नव्हती. जानेवारी-२०२४च्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यांच्या पक्षाने जवळपास एकतर्फी विजय मिळवला होता. त्यांना ३०० जागांपैकी २२४ जागा मिळाल्या होत्या. शेख हसीना सुमारे १६ वर्षांपासून सलग देशाच्या पंतप्रधानपदी विराजमान होत्या. परिणामी, देशातील लोकशाही आणि सरकारी यंत्रणांना, त्यांनी आपल्या खिशातच बाळगले होते. हसीना यांनी, निवडणुकांचा अक्षरश: खेळ करुन टाकला होता. बहुतांशी विरोधी नेत्यांना त्यांनी तुरुंगात तरी डांबले किंवा देश सोडण्यास भाग पाडले. जवळ-जवळ सर्वच मोठ्या



नेत्यांवर त्यांनी खटले दाखल केले होते. निवडणूक आयोग तर, त्यांच्या हातातील बाहुले बनले होते. प्रसिद्धीमाध्यमे आणि नागरिकांचा आवाज दाबण्यात आला, व्यक्तिस्वातंत्र्य नावाचा प्रकारच बांगलादेशात अस्तित्वात राहिला नव्हता.


शासकीय संस्थांना आपल्या हातातलं खेळणं बनवून, सरकारी यंत्रणांकडे देशातील विरोधीपक्षाचे नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि विचारवंतांचा आवाज दाबण्याचा एककलमी कार्यक्रम सोपविण्यात आला होता. बांगलादेशी संसद ही, शेख हसीना यांच्या पक्षाची जहागिरी बनली होती. मनाला वाटेल तसे कायदे बनविणे व ते अंमलात आणणे यापलीकडे तिथे काहीच घडत नव्हतं. शेख हसीना आणि त्यांच्या 'अवामी लिग' या पक्षाच्या नेतृत्त्वाखाली जे काही घडत होतं, त्याची सर्व लक्षणं आम्ही आमच्या देशात गेल्या १० वर्षांपासून बघतच आहोत. विरोधीपक्षांच्या कमकुवतपणामुळेच या प्रस्थापित हुकुमशहांचा सामना करत कर्मकठीण झालंय... अखेर बांगलादेशी जनतेनं, या बेबंदशाहीचं समूळ उच्चाटन करुन, हुकूमशहा शेख हसीना यांना, देश सोडण्यास भाग पाडले. जनशक्ती ही, जगातली सर्वात मोठी ताकद आहे. हुकूमशहांचा शेवट हा, नेहेमीच जनतेने घडवून आणलाय. अमेरिकेसारख्या बलाढ्य सैनिकी-शक्ती असणाऱ्या देशालाही, व्हिएतनामच्या जनतेने अत्यंत लाजिरवाण्या पद्धतीने पराभूत केले होते. जनता-जनार्दनासमोर सर्वप्रकारची आयुधं, शेवटी कुचकामी ठरतात !!!

*(समाजमाध्यमातून साभार...)*

## ''महाराष्ट्रात महागुंतवणूक'' अशा दिलखेचक शीर्षकाखाली लिथियम बॅटरी, EV, सेमीकंडक्टर चिप, फळांचा पल्प निर्मितीच्या वगैरे क्षेत्रातील ८१ हजार कोटींच्या राज्यातील गुंतवणुकीच्या सात प्रकल्पांची व त्यातून, २०–२५ हजार थेट रोजगारांची; तर, ५० हजार अप्रत्यक्ष रोजगारांची राणाभीमदेवी थाटात देवेंद्र फडणवीसांनी नुकतीच मोठी गर्जना केलीय (उपमुख्यमंत्री अशा महत्त्वपूर्ण घोषणा करत असतात...तेव्हा, मुख्यमंत्री फक्त 'तोंडी लावण्यापुरतेच').

या घोषणांचे पतंग हवेत उडवले जात असतानाच, ''मी कोणाच्या नादाला लागत नाही आणि कोणी माझ्या नादाला लागलं; तर, मी त्याला सोडत नाही'' अशी वल्गनाही फडणवीसांनी मा. उद्धवजी ठाकरेंना उद्देशून केलीय.

**तोच धागा पकडून 'धर्मराज्य'च्या व्यासपीठावरुन 'वैदर्भीय' फडणवीसांना (हा मुद्दाम उल्लेख अशासाठी कारण त्यांचा, पूर्वाश्रमींचा काँग्रेसवासी असलेला, 'राजकीय-पोपट' आशिष देशमुख याने मा. उद्धवजींना आव्हान देताना, विदर्भातून एकही आमदार निवडून आणल्यास 'माझं नाव बदलीन', अशी भीष्मप्रतिज्ञा केलीय...याच संदर्भात, मुंबईचे 'बोलबचन' भाजपा-नेते आशिष शेलारांची अशीच एक भीष्मप्रतिज्ञा, लोकसभा-निवडणुकीत मुंबईत 'भाजपा'चा दारुण पराभव झाल्यापश्चात, अद्यापही महाराष्ट्राच्या लालकाळ्या मातीची धूळ खात पडून असल्याचं, वाचकांना स्मरत असेलच**...तिचं गत, विदर्भातल्या दुसऱ्या 'आशिष'च्या बनावट प्रतिज्ञेची होणार) महाराष्ट्रातील समस्त कामगार-कर्मचारीवर्गातर्फे आम्ही आव्हान देत आहोत (थोडक्यात, 'त्यांच्या नादाला लागत आहोत') की, ''त्या नोकऱ्या महाराष्ट्रातील बेरोजगार युवक-युवतींना देण्याअगोदर, त्या कुठल्या लायकीच्या व औकातीच्या देणार आहात, हे स्पष्ट करा... त्या नोकऱ्या 'कायमस्वरुपी' असणार की, 'कंत्राटदारी'तल्या 'गुलामगिरी व नव-अस्पृश्यते'च्या स्वरुपातल्या असणार, हे जाहीर करण्याची हिंमत दाखवा... त्या नोकऱ्यांमध्ये, तेच सध्याचं दळभद्री व तुटपुंज असलेलं 'किमान-वेतन' देणार की, ग्रामीण भागात सरासरी ५० हजाराचं सन्मानजनक वेतन देणार, ते ही एकदा जाहीर कराच... म्हणजे, तुम्ही देऊ करत असलेला रोजगार, हा 'रोजगार' आहे की, 'अर्धरोजगारी'तला 'पोटावर मार' आहे, ते जरा ग्रामीण भागातल्या भोळसट तरुणाईला एकदा कळूच द्या!''




**तुम्ही आणि तुमचा पक्का भांडवलदार-शेठजींचा पक्ष असलेल्या 'भाजप'ला, मा. उद्धवजींच्याच मूळ व खऱ्या शिवसेनेने आपल्या हाताचं बोट धरायला देऊन मोठं केल्याचं, उभा महाराष्ट्र पहात आला...हेच महापातक, आपल्याला भोवल्याचंही मा. उद्धवजी अनेकदा बोलून गेल्याचंही आपल्याला चांगलंच ठाऊक असणार...तेव्हा, ज्यांच्या जीवावर आपण मोठे झालो; त्यांनाच उठसूठ आव्हान देण्याचा उफराटेपणा न करता, महाराष्ट्रभरातील तमाम कामगार-कर्मचारीवर्ग आपल्याला देत असलेलं उपरोल्लेखित आव्हान स्विकारा! मा. उद्धवजींचा करण्याऐवजी कामगारांचा 'नाद' करा...अन्यथा, तुम्ही हजारो रोजगारांचे हे जे 'पतंग', भर पावसात उडवू पहाताय...ते तुम्ही, दिल्लीश्वरांच्या इशाऱ्यावर, महाराष्ट्रात लादू पहात असलेल्या ''काळ्या 'कामगार-संहिते'च्या (Black Labour-Code) पिंजऱ्यात अवघ्या मराठी-तरुणाईला उंदरासारखं अडविण्याच्या षडयंत्री डावपेचांचंच 'एक अंग' आहे, हे महाराष्ट्राचा नवतरुण कामगार समजून चुकेल!**

जाता जाता एक गोष्ट लक्षात ठेवा, गेल्या लोकसभा-निवडणुकीत जेवढा खंबीरपणे महाराष्ट्रातला कामगार, उद्धवजींच्या व राहुलजींच्या पाठिशी उभा होता...त्याहीपेक्षा, अधिक खंबीरपणे येत्या विधानसभा-निवडणुकीत त्यांच्या पाठिशी उभा राहील...

**हाती गद्दारीचा 'खंजीर' असणाऱ्यांना, महाराष्ट्राचा 'खंबीर' कामगार, हेच योग्य उत्तर होय!**

***...राजन राजे***

---

'कम्युनिस्ट' या नुसत्या शब्दोच्चाराने देखील आज अनेक अज्ञानी जीवांच्या छातीत धडकी भरते. कम्युनिस्ट किंवा कम्युनिझम, हा शब्द कार्ल मार्क्स याने अपवादानेच वापरला. तो स्वतःला 'सोशालिस्ट'च (समाजवादी) म्हणवत असे. फ्रेडरिक एंजेल्ससह लिहीलेल्या आपल्या पहिल्यावहिल्या पुस्तिकेला त्याने 'कम्युनिस्ट-मॅनिफेस्टो' हे नाव देण्याचं कारण बहुधा, तत्कालिन समाजाचं एकदम लक्ष वेधून घेण्यासाठीच असावं. सोव्हिएत युनियन व चीन यांनीदेखील आपल्या देशाच्या नावात 'सोशालिस्ट' याच शब्दाचा वापर केला...कम्युनिझम किंवा साम्यवाद, हा त्या समाजवादी-प्रवासाचा पुढचा टप्पा व अंतिम गंतव्य स्थान! स्कँडिनेव्हियन (नॉर्वे, स्वीडन, फिनलंड) राष्ट्रांमधील, स्पेन, फ्रान्स, पोर्तुगाल, जर्मनीमधील सरकारे आजही 'समाजवादी' विचारधारेवरच चालतात.

*...राजन राजे* (भाई)

जगभरातल्या 'सोशॅलिझम'च्या वाहत्या वाऱ्यांपासून 'गोदी-मिडीया'च्या बदमाषीमुळेच भारतीय जनता अनभिज्ञ रहाते (फ्रान्समधली मुदतपूर्व सार्वत्रिक-निवडणूक डाव्या आघाडीने जिंकल्याच्या बातम्या भारतीय-प्रसारमाध्यमातून गायबच) असंच नव्हे; तर, कट्टर भांडवलदार असलेल्या अमेरिकन प्रसारमाध्यमांतून देखील त्याची रुजवात न झाल्याने, अमेरिकन जनतेलाही फारशी माहिती नसते. मात्र, आजही रशिया व चीनमधल्या लोकशाही-हक्कांची गळचेपी होणाऱ्या अथवा अन्य नकारात्मक बातम्यांची पेरणी किंवा खरंतरं 'मारा', सगळ्याच प्रसारणसंस्थांतर्फे सातत्याने व खुबीने केला जात रहातो...त्यामुळेच, 'साम्यवाद-समाजवाद' (Communism-Socialism) या शब्दांविषयी अगदी तिरस्कार नसला; तरी, एक मोठा 'भयगंड' समाजात कायमस्वरुपी असतो, जे भांडवली-व्यवस्थेचं ईप्सितच!

*...राजन राजे* (भाई)

# शिवछत्रपतींचा पुतळा कोसळल्याप्रकरणी, न्यायालयीन चौकशीच हवी... नौदलावर आक्षेप घेणे योग्य नाही !!!

अत्यंत व्यथित अंतःकरणाने लिहीत आहे. खरं तर लिहायचा अजिबात मूड नव्हता; परंतु, काल संध्याकाळपासून जो राजकीय आरोप-प्रत्यारोपांचा 'शो' सुरु आहे, ते पाहून याच्या मुळाशी जाणे जरुर वाटल्यानेच की-बोर्ड हाती घेतला आहे. काल सिंधुदुर्ग जिल्ह्यात, जलदुर्ग-सिंधुदुर्ग जंजिरे राजकोटजवळ अवघ्या सात-आठ महिन्यांपूर्वी उभारलेला शिवछत्रपती महाराजांचा पूर्णाकृती पुतळा कोसळला, ही छातीत धडकी भरवणारी बातमी आली आणि राज्यातील राजकीय प्रदूषण अधिकच वाढले. साहजिकच आहे म्हणा; कारण, शिवछत्रपती हा महाराष्ट्राचा प्राण आहे, त्या प्राणालाच काही इजा होत असेल तर, राजकीय पक्षांची तगमग तर होणारच. तशी ती झालीही पाहिजे. कारण, त्यांच्या 'राजकीय' जगण्याचा तो एक अविभाज्य घटक बनून गेलेला आहे. पुतळा पडल्याने दुःख होणे समजू शकते; पण, त्या दुःखाचा आधार घेत राजकीय धुळवड करणे योग्य नाही. राजकीय प्रदूषण सुरु असतानाच, कोपऱ्यात अंग चोरुन उभ्या असलेल्या नौदालालाही लक्ष्य करणे सत्तारुढ पक्षाने सोडले नाही; म्हणून, खरे तर हे दोन शब्द नाहीत, असंख्य शब्द... कारण, शहाण्याला शब्दाचा मार ही म्हण आता जुनी झाली आहे. दाखल्यासाठी अनेक गोष्टी सांगितल्यानंतरही डोक्यात प्रकाश पडत नाही हल्ली; म्हणून, असंख्य शब्द!

पुतळा पडल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे म्हणाले, जोरदार वाऱ्यामुळे हे झालेले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात, पुतळा उभारण्याचे काम नौदलाकडे दिलेले होते तर, विरोधीपक्षांनी या प्रकरणाची कसून चौकशी झाली पाहिजे, ही जुनीच टेप लावली आहे. तेही बिचारे या शिवाय दुसरे काय करु शकतात? असो... आमच्यासमोर आता, राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचा निर्णय क्रमांक : पुतळा/३११६/प्र.क्र. ३०८/२९ हा मसुदाच आहे. यात म्हटलेले आहे की, राष्ट्रपुरुष वा थोर व्यक्ती यांचे पुतळे उभारण्याबाबत, शासनमान्यता मिळवण्यासाठी, सरकारकडे प्रस्ताव सादर होत असतात. यावर अर्थातच हरकती, मान्यता पत्रे, ना-हरकत पत्र, आदी अनेक बाबी विचारात घ्याव्या लागतात. यामुळे, अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. म्हणूनच, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय (वर्ष-२०१३) डोळ्यांसमोर ठेवून सरकारने पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

### राज्य सरकारचीच समिती असते...

या निर्णयात पुतळ्यासंबंधी प्रस्तावाची छाननी करण्यासाठी, जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली असून, त्यात महापालिकांचे आयुक्त वा जिल्हा परिषदेचे कार्यकारी अधिकारी, पोलीस आयुक्त वा जिल्हा पोलीस अधीक्षक, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक-अभियंता तसेच, निवासी उप-जिल्हाधिकारी अशी पाचजणांची समिती नेमण्यात आलेली होती. ही सर्व राज्य सरकारचीच माणसे आहेत; मग, यात नौदलाचा संबंध येतो कुठे? संतापजनक बाब तर पुढेच आहे. पुतळा उभारणाऱ्या संस्थेने/कलाकाराने, पुतळ्याच्या क्ले-मॉडेलला कला संचालनालायची मान्यता घेऊन, ब्रांझ वा अन्यधातू, फायबर व इतर साहित्यापासून पुतळा तयार करावा व मान्यता घेतलेल्या मॉडेलप्रमाणेच, पुतळा उभारण्याची दक्षता घ्यावी असे स्पष्ट निर्देश असतानाही, महाराजांच्या पुतळ्याच्या वेळेस यातील कोणतीही सूचना कलाकाराने अजिबात पाळलेली नाही, अशी माहिती आहे. याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे, कला-संचालक यांनी तीन ज्येष्ठ कलाकारांची समिती तयार करुन, कलाकृतीची पाहणी व निरीक्षण करावे, अशी स्पष्ट सूचना धाब्यावर बसवण्यात आल्याची कुजबुज, जे.जे. कला महाविद्यालय परिसरात होत होती. आतील माहिती अशी की, तीन ज्येष्ठ कलाकारांना पत्रे ही गेलेली होती; परंतु, कलाकृती गडबडीत तयार केली जाणार असल्याचे लक्षात येताच, या ज्येष्ठानी काढता पाय घेतला. खरं तर सर्वोच्च न्यायालयाच्या मतानुसार कलाकृती तयार होत असताना, प्रत्येक टप्प्यात त्याचे निरीक्षण गरजेचे असते, असे काहीही न करता, पी हळद आणि हो गोरी यापद्धतीने हा पुतळा तयार केला गेला होता, असे एका ज्येष्ठ कलाकाराने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले. अधिक माहिती अशी मिळाली की, त्या राज्यातील कला संचालक व केंद्रीय सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अभियंत्यांनी हे काम करायचे असते, येथे केंद्रीय सार्वजनिक बांधकाम खात्याऐवजी, राज्यातील सार्वजनिक बांधकाम खाते आले.

सर्वोच्च न्यायालयात I 10 of 2012 in slp/c/8516 व C/314/2010 बाबत, दि. १८ जानेवारी-२०१३ रोजी देण्यात आलेल्या आदेशाचे पालन करुन, त्याचे उल्लंघन होत नसल्याबाबत जिल्हाधिकारी व त्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने प्रमाणित करावे, असे स्पष्ट शब्दात लिहीलेले असताना, मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री व सार्वजनिक बांधकाममंत्री, पुतळा पडण्याची जबाबदारी नौदलावर का टाकत आहेत? हे समजण्यापलीकडचे आहे. म्हणूनच, आम्ही या संपूर्ण प्रकरणाची न्यायालयीन चौकशीची मागणी करत आहोत. महाराजांच्या पुतळ्यासंदर्भात कोण कमी पडले, हे जनतेला कळलेच पाहिजे व दोषींना कडक सजा ही झालीच पाहिजे... शिवाय इतक्या महत्त्वाच्या कामाची निविदा का काढण्यात आली नाही, हेही आश्चर्यच आहे. खरे तर, कोट्यवधी रुपयांच्या या कामाची निविदा का काढली गेली नाही? हे न्यायालयच विचारु शकते व त्याचे उत्तर देणे सरकारवर बंधनकारक राहील !!!

*....विजयकुमार काळे*

# फुकट संस्कृतीच्या आयचा घो !!!

वर्ष-१९७२मध्ये राज्यात मोठा दुष्काळ पडला होता. पाणी होतं; पण, लोकांना खायला अन्न नव्हतं. अमेरिकेकडून निकृष्ट गहू व लाल ज्वारी (मिलो) यायची. तत्कालीन मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांनी, प्रथमच कायदा करुन तत्कालीन विधानसभा सभापती वि.स. पागे यांनी तयार केलेली, रोजगार हमी योजना (रोहयो) विधानसभेत मांडून, मागेल त्याला काम यासाठी 'रोजगार हमी योजना कायदा' केला. त्यावेळी रोजगार हमीतून रस्ते, तलाव, बंडींग, नाला-बंडींग अशी विकासाची अगणित कामे झाली. लोकांना 'श्रमाच्या' मोबदल्यात कामाच्या हिशोबाने सरकारने धान्य व पैसे दिले.

सरकारने त्या वेळी मनात आणलं असतं तर, आजच्या राज्यकर्त्यांसारखे धान्य व पैसे लोकांना फुकट वाटू शकले असते; परंतु, त्यावेळचे राजकारणी धोरणी व व्यवहारी होते. या संकटाचे त्यांनी संधीत रुपांतर केले. भीषण दुष्काळात लोकांना सरकारने जगवले आणि त्याबदल्यात त्यांनी लोकांकडून विधायक कामे करून घेतली. गेले ते दिवस... आता, घरातील दोन महिला ३००० रु. प्रतीमहा, वार्षिक ३६,०००, पदवीधर मुलगा १०,००० रु. प्रतीमहा, वार्षिक १,२०,०००... एकूण अवघे १,५६,००० इतकेच तुटपुंजे वार्षिक उत्पन्न!

**शेतकरी सन्माननिधी, तीन स्वतंत्र अकाऊंट करुन, १८,००० रुपये वार्षिक.**

**एकुण – १,५६,००० + १८०००**

**= १,७४,०००/वर्ष**

**रेशन + आयुष्यमान मोफत**

**कशाला मजूर मिळतील शेतीसाठी? आणि, तरुणाई नेत्यांच्या मागे फिरायला मोकळी. छोट्या-मोठ्या व्यवसायातदेखील, कामगार मिळणे अवघड झालं आहे. अशा फुकट संस्कृतीतून व्यसनाधीनता, गुन्हेगारी, सामाजिक व कौटुंबिक समस्या उभ्या ठाकणार आहेत. अर्थसहाय्य करायचेच तर, ते अंध-अपंग व निराधारांना करा, याला हरकत नाही; पण, फुकट पोसू नका. अर्थसहाय्य, मोफत धान्य द्यायचे तर, ते श्रमाच्या मोबदल्यात द्या. तेदेखील, दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींनाच. त्यांच्याकडून रस्ते, गावतळे, पाझर तलाव, ग्रामस्वच्छता, शहर स्वच्छता, वृक्षारोपण, चाऱ्या-कालव्यांची दुरुस्ती व प्रसंगी शेतीतली कामे करुन घ्या. घामाच्या बदल्यात दाम द्या. तात्पुरत्या आणि मोफत मलमपट्टीपेक्षा, तरुणाईला कायमस्वरुपी रोजगार द्या, लघुउद्योग उभारणी करा, शेती व जोडधंद्यांचे सक्षमीकरण करा, महिलांना आत्मनिर्भर बनवा, आदिवासी, मागासवर्गीय घटकांना आर्थिक ऊन्नतीकडे न्या. समाजाला लाचार, बनविण्याऐवजी स्वाभिमानी बनवा. क्षणिक मतांच्या बेगमीसाठी जनतेला लाचार बनवू नका!**

फुकट संस्कृतीतून लाचारांची फौज उभी राहील. मतांच्या जोगव्यासाठी समाज, तरुणाई लाचार होणे राजकारण्यांना हवे आहे. पण, याचे परिणाम पुढील पिढी कर्तृत्वाने मोठी होणार नाही, बरबाद होईल. व्यसनांनी, गुन्हेगारीने नासून जाईल. हे होवू नये यासाठीच मोफत संस्कृतीच्या आयचा घो! विचार करा, विरोध करा !!!

*समाजमाध्यमातून साभार*






*नवी मुंबईतील, महापे औद्योगिक वसाहतीमध्ये असलेली सुमारे १०० ते १५० दुर्मिळ जातीची झाडे जेसीबीच्या माध्यमातून तोडून, जाणीवपूर्वक वृक्षांची कत्तल केल्याच्या निषेधार्थ 'रिपब्लिकन बहुजन सेना' या पक्षाच्या वतीने, महाराष्ट्र राज्याचे प्रमुख संघटक श्री. किशोर चंद्रकांत लासुरे यांच्या मार्गदर्शनाखाली, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ दि. ८ ऑगस्ट-२०२४ रोजीपासून आमरण उपोषण सुरु करण्यात आले असून, ''भारतातील पहिलावहिला पर्यावरणस्नेही हरित-पक्ष'' अशी ओळख असणाऱ्या 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष मा. राजन राजे यांनी, दि. २१ ऑगस्ट-२०२४ रोजी, उपोषणस्थळी उपस्थित राहून, आंदोलनकर्त्यांची भेट घेत, त्यांना आपला पाठींबा दर्शविला. यावेळी 'रिपब्लिकन बहुजन सेने'च्या कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन, मा. राजन राजे यांनी त्यांच्या मागण्या जाणून घेतल्या आणि निसर्गरक्षण व पर्यावरणाच्या संवर्धनासाठी, एक कडवट 'पर्यावरणवादी पक्ष' या नात्याने, 'धर्मराज्य पक्ष' आपल्या सदैव पाठीशी असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. याप्रसंगी 'धर्मराज्य पक्षा'चे सहसचिव श्री. नरेंद्र पंडित, ठाणे लोकसभा उपाध्यक्ष श्री. महेशसिंग ठाकूर आणि 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे सचिव श्री. समीर चव्हाण आदी पदाधिकारी उपस्थित होते.*

# काश्मीरची नव्हे आणि बदलापूरची तर नव्हेच नव्हे....तर, अगदी ताजी घटना आहे ही झारखंडची!

**झारखंडची राजधानी रांचीच्या मोराबादी मैदानावर भाजपा युवा मोर्चातर्फे 'आक्रोश-रॅली' आयोजित करण्यात आली होती. त्यादरम्यान, झालेल्या हिंसाचारात भाजपा-युवा मोर्चावाल्यांनी अट्टल दंगेखोरांसारखी खुलेआम पोलिसांवर तूफान दगडफेक करत त्यापैकी अनेक पोलीसांना गंभीर जखमी केलंय...**



**बदलापुराच्या घटनेतील छुटपुट दगडफेकीचं निमित्त साधून समस्त बदलापूरकर-आंदोलकांना, मोठी पोलिसी-कार्यक्षमता दाखवत (जी एरव्ही, अंबरनाथ-बदलापुरच्या गुंड राजकारण्यांकडून दिवसाढवळ्या सर्रास गुन्हे घडत असताना पेंड खात असते), जेरबंद करणारे भाजपावाले यावर काही प्रतिक्रिया देणार का?**

...एवढंच नशीब समजायचं की, त्या बदलापूरच्या शाळेत लहानग्यांवर लैंगिक-अत्याचार करणारा कुणी 'मुस्लिम' नव्हता आणि बदलापूर-स्टेशनमध्ये रेल-रोको करणारेही कुणी 'मुस्लिम' नव्हते...तसं काही दुर्दैवाने असतं; तर मग, सगळे गुजराथी 'बँकबुडवे मोदी' परदेशात पळाले, तसं त्या शाळा-संस्थाचालकाला पळून जाण्यास भाजप-सरकारने 'छुपी मदत' केली असती व महाराष्ट्राची विधानसभा-निवडणूक वेड्यावाकड्या पद्धतीने जिंकण्यासाठी महाराष्ट्रभरात दंगलप्रवण वातावरण 'भाजपा आयटी-सेल' व 'अंधभक्तां'करवी निर्माण केलं असतं...आणि समजा, त्या दंगलीच्या भांडवलावर निवडणूक जिंकलीच असती; तर, जिंकल्यापश्चात ''शाळेत CCTV न लावणाऱ्या व मुलींच्या सुरक्षिततेची अजिबात काळजी न घेणाऱ्या'' त्या संस्थाचालक 'नरपुंगवा'ला, निवडणूक जिंकण्यासाठी निमित्त बहाल केल्याबद्दल 'बक्षिसी' म्हणून, कुठलातरी शैक्षणिक क्षेत्रातला वगैरे 'नरवीर' बनवून 'पद्मश्री' बहाल केली असती (सध्या 'राज्यसभा-सदस्यत्व' किंवा 'मानवाधिकार-आयोगा'चं अध्यक्षपद रिक्त नसल्याने केवळ, 'पद्मश्री'वरच भागवावं लागलं असतं)! ***...राजन राजे***




मोदी-शाहांच्या भाजपाई केंद्र सरकारपुरस्कृत, येऊ घातलेल्या कामगारविरोधी काळ्या कायद्यांपासून आणि नव-अस्पृश्यता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कंत्राटी-कामगारपद्धतीच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी, मुजोर कंपनी व्यवस्थापन व प्रस्थापित राजकीय व्यवस्थेशी सनदशीरमार्गाने संघर्ष करुया...

'धर्मराज्य पक्ष'प्रणित

**'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ'**

या कामगार संघटनेत सामील व्हा !!!

राजन राजे
(अध्यक्ष)



महेशसिंग ठाकूर
(महासचिव)
९७६९५ २५००६

रमाकांत नेवरेकर
(उपाध्यक्ष)
७२०८८ ७९१९७



कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०


Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (TITLE CODE : MAHMAR52590)